मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९९ ■ सोमवार, ३० मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# राज्यात गॅस, पेट्रोलसाठी रांगाच रांगा

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू झालले एलपीजी गॅस, पेट्रोलचे संकट काही संपता संपण्याचे नाव घेत नाही. राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर (२८ मार्च) आज रोजीही भल्या मोठ्या रांगा दिसल्या. मुंबई, पुण्यासह छत्रपती संभाजीनगरमध्ये तर दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. तर काही ठिकाणी तर थेट मारामा-या होतानाही दिसत आहेत. जालन्यातील पेट्रोल पंपावर एका टोळक्याने थेट पेट्रोल पंप कर्मचा-यांनाच बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. पेट्रोल दिले नाही म्हणून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑटो एलपीजी गॅससाठी दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या पैठण रस्त्यावरील नक्षत्रवाडी पंपावर ऑटो चालकांची मोठी गर्दी झाली आहे. पहाटे ५ वाजल्यापासूनच ऑटोरिक्षा चालक पंपावर गॅसच्या प्रतीक्षेत रांगेत उभे आहेत. एका दिवसात गॅसचे दर १० रुपयांनी वाढल्याने आता ऑटो एलपीजी गॅस १०० रुपये प्रति लिटरवर गेला आहे. २० दिवसांत ऑटो एलपीजी गॅसचे दर



तब्बल ४९ रुपयांनी वाढले आहेत. पहाटे ४ वाजल्यापासून ऑटोरिक्षा चालक पंपासमोर रांगेत उभे आहेत. तर काही रिक्षाचालक पंपावरच मुक्कामी आहेत.

जालन्यात पेट्रोल पंपावरच मारहाण

जास्तीचे डिझेल न दिल्यामुळे एका पेट्रोल पंप चालकास मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. काल रात्री साडेनऊच्या सुमारास जालना तालुक्यातील वानडगाव येथील पेट्रोल पंपावर पेट्रोल पंप चालकास ३ ते ४ व्यक्तींनी १००० लिटर डिझेलची मागणी केली. सध्याची टंचाई पाहता पेट्रोल पंप चालकाने यास नकार दिल्यामुळे या पेट्रोल पंप चालकास बेदम मारहाण करण्यात आली. राहुल उगले असे पेट्रोल पंप चालकाचे नाव असून याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करून न्याय देण्याची मागणी या पेट्रोल पंप चालकाने केली आहे.

कोल्हापुरात ३० टक्के रिक्षा बंद

कोल्हापुरात एलपीजी गॅसच्या किमतीत भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. वाढलेल्या एलपीजी गॅसच्या किमतीमुळे कोल्हापूर शहरातील ३० टक्के रिक्षा व्यवसाय बंद झाला आहे. पुढच्या दोन दिवसांत शहरातील रिक्षा व्यवसाय ठप्प होण्याची चिन्हे आहेत. एलपीजी गॅसचे दर कमी करा अन्यथा आंदोलन छेडणार असल्याचा इशारा कोल्हापुरातील रिक्षाचालकांनी दिला आहे.

ठाण्यात बाटली, कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल विक्रीवर बंदी

समाजमाध्यमांवर पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या अफवा आणि बातम्या पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवरून खुल्या स्वरूपात इंधन विक्री करण्यास तातडीने मनाई केली आहे. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना प्लास्टिकच्या बाटल्या, कॅन, डबे किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या भांड्यांमध्ये सुटे पेट्रोल अथवा डिझेल विकता येणार नाही, असा आदेशच पांचाळ यांनी काढला आहे.

## साकोलीत सम्राट अशोक जयंतीनिमित्त एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे प्रतिनिधी**

**साकोली** : बहुजन समाज पार्टी, साकोली विधानसभा यांच्या वतीने सम्राट अशोक जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सामाजिक परिवर्तन व आर्थिक मुक्ती आंदोलन अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मान्यवर कांशीराम साहेब व बहन मायावती यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी "जय भीम, नमो बुद्धाय" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

शिबिराचे प्रमुख वक्ते विनोद बोधी सर यांनी आपल्या मार्गदर्शनात बहुजन समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी शिस्त, जागरूकता व विचारांची एकजूट अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी कार्यकर्त्यांना गावपातळीवर जाऊन बहुजन विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. याप्रसंगी नित्यानंद मेश्राम, विजय नंदागवळी , विलास मेश्राम व गोवर्धन मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती . सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन केले.या प्रशिक्षण शिबिरात विविध विषयांवर मार्गदर्शन सत्र, चर्चा व संघटनात्मक नियोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत भविष्यातील कार्यक्रमांसाठी ठोस दिशा निश्चित केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्तिक मेश्राम यांनी केले तर आभार अमित रामटेके यांनी मानले.

## एसआयआर अभियानाच्या पनवेल विधानसभा प्रमुखपदी परेश ठाकूर यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सहीच्या अधिकृत पत्राद्वारे महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या मतदार पुनर्निरीक्षण (SIR) अभियानासाठी भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशतर्फे १८८ – पनवेल विधानसभा क्षेत्राचा BLA-१ (विधानसभा प्रमुख) म्हणून पनवेल महापालिकेचे माजी



सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी बाब आहे.

त्यांच्या नेतृत्वातून संघटन अधिक बळकट होऊन कार्याला नवी गती मिळेल, असा विश्वास आहे असे म्हणत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरसेवक परेश ठाकूर यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडूनही परेश ठाकूर यांचे अभिनंदन होत आहे.

## वाघमारे हॉस्पिटल आणि वाघमारे मेडिकल द्वारा मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी विजय खुडे/कळमनुरी** : आखाडा बाळापूर येथील वाघमारे हॉस्पिटल आणि मेडिकलच्या वतीने परिसरातील नागरिकांसाठी एका विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार, दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० या वेळेत पार पडणार आहे.

या शिबिरात अस्थिरोग व संधिवात तज्ज्ञ डॉ. अभिजीत




तरटे (MBBS, MS Ortho) रुग्णांची तपासणी करणार आहेत. गुडघेदुखी, खांदा किंवा इतर सांधेदुखीने त्रस्त असलेल्या नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

शिबिरात खालील आजारांवर मार्गदर्शन व तपासणी केली जाईल:

सांधे व हाडांचे आजार: (लिगामेंट फाटणे (ACL tear), सांध्यांची झीज (संधिवात), गुडघ्यातील गादी फाटणे. (meniscus) हाडे ठिसूळ होणे, तसेच खेळातील दुखापत.

लहान मुलांचे उपचार: जन्मतः वाकडे पाय, मुलांवरील प्लास्टरचे उपचार आणि हाडांच्या शस्त्रक्रिया.

मणक्याचे आजार (Spine): कंबरदुखी, मानदुखी, मणक्याचे फ्रॅक्चर, स्लिप डिस्क (Slip Disc) व मणक्याशी संबंधित समस्या. सर्व आरोग्य वर मोफत तपासणी ची सुविधा डॉ अभिजित वाघमारे सरानी उपलब्ध करून दिली आहे तरी सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे

या शिबिराचे ठिकाण 'वाघमारे कॉम्प्लेक्स, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, आखाडा बाळापूर,ता कळमनुरी जि. हिंगोली' हे असून, अधिक माहितीसाठी मो 7744869056या नंबर वर संपर्क करावा

## ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाचे नवीन सत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : ३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.

३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो.त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

## घाटंजी तालुक्याचा शैक्षणिक दबदबा! कुर्ली आणि शिरोली जि.प. शाळांची 'आदर्श शाळा' म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश पेन्दोर** : घाटंजी तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' योजनेत घाटंजी तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा, कुर्ली आणि जि.प. उच्च प्राथमिक शाळा, शिरोली या दोन शाळांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील निवडक ४०५ शाळांच्या यादीत तालुक्यातील दोन मराठी शाळांनी स्थान मिळवल्याने शिक्षण वर्तुळात घाटंजीचा डंका वाजला आहे.

**काय आहे ही योजना?**

या योजनेच्या माध्यमातून निवड झालेल्या शाळांचा कायापालट केला जातो.



यामध्ये प्रामुख्याने:

आधुनिक इमारती व वर्गखोल्या: शाळांना देखणे स्वरूप देऊन डिजिटल बोर्ड व आधुनिक शैक्षणिक साहित्य दिले जाईल.

पिंक रूम व स्वच्छता: विद्यार्थिनींसाठी विशेष 'पिंक रूम' आणि अद्ययावत स्वच्छतागृहांची सोय.

गुणवत्तापूर्ण शिक्षण: विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष उपक्रम राबवले जातील.

**ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि पाठपुराव्याचे फळ**

कुर्ली आणि शिरोली या दोन्ही शाळांच्या प्रगतीसाठी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विशेषतः पालक-ग्रामस्थांनी सातत्याने प्रयत्न केले होते. या शाळांच्या निवडीसाठी लोकप्रतिनिधी आणि शिक्षण विभागाकडे करण्यात आलेला पाठपुरावा अखेर फळाला आला आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य मुलांच्या शिक्षणासाठी हा मैलाचा दगड ठरणार आहे.

**सर्व स्तरांतून कौतुक**

या यशाबद्दल तालुक्यातील शिक्षण प्रेमींकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

> **"आमच्या शाळेची राज्यस्तरावर झालेली ही निवड म्हणजे संपूर्ण गावच्या एकजुटीचा विजय आहे. आता ग्रामीण भागातील मुलांनाही शहरासारख्या आधुनिक सुविधा आपल्या गावातच मिळतील."**
>
> **— ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती, घाटंजी तालुका.**

कुर्ली आणि शिरोली शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संपूर्ण तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

घाटंजी तालुक्यातील शिक्षणाची ही नवी भरारी, भविष्यातील उज्ज्वल पिढी घडवण्यास नक्कीच मदत करेल!

## लाखोरी रोड ते आदर्श नगर परिसरातील कचरा गाडी बेपत्ता; नगरपंचायत चा भोंगळ कारभार

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया /भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : लाखनी नगरपंचायत अंतर्गत लाखोरी रोड ते आदर्श नगर या परिसरातील प्रभाग 4 , वार्ड क्रमांक 6 मध्ये रोज कचरा गोळा करणारी नगरपंचायत ची कचरा गाडी नित्यनेमाने येत होती. मात्र या आठवड्यात कचरा गाडी बेपत्ता झाल्याने नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपंचायत च्या भोंगळ कारभाराने जनता त्रस्त झाली आहे.

नगरपंचायत लाखनी अंतर्गत लाखोरी रोड ते आदर्श नगर या परिसरात कचरा गाडी सहा सात- दिवसापासून अचानक बेपत्ता झाल्याने नागरिकांना कचरा कुठे टाकावा असा प्रश्न निर्माण झाला असून या प्रभागातील नगरसेवक झोपेचे सोंग घेऊन बसले असल्याची चर्चा प्रभागातील जनतेमध्ये सुरू आहे. नगरसेवकाचा उदासीन पणामुळे या प्रभागातील जनतेला कचरा कुठे टाकावा असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लाखनी नगरपंचायत ने नुकताच अवाढव्य घर टॅक्स लादला असून 50% च्या आसपास कर वसुली झाल्याचे बोलल्या जाते. करवाढ च्या विरोधात जनतेच्या मनात तीव्र भावना असून येत्या निवडणुकीत लोक नगरसेवकांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. यासंबंधी काही नगरसेवकांनी तर मूक संमती दर्शवून खिसे गरम करून घेतल्याची चर्चा जनतेत दिसून येते. जनभावनाचा आदर नगरसेवकांनी न केल्यामुळे जनतेमध्ये करवाढ विरोधात तीव्र रोष व्यक्त केल्या जात आहे. या नगरपंचायतने घर टॅक्स वाढीच्या संदर्भात फक्त एकमेव नगरसेवक राजेश बबलू भाऊ निंबेकर यांनी आवाज उचलला व सामान्य जनतेचा प्रश्न सोडवण्यासाठी लेखी निवेदन देऊन व्यापाऱ्यांची व जनतेची बैठक घेऊन मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले त्यानुसार नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांना विशेष ट्रेबल लावून कर वाढ कमी करण्यासाठी इतर कर्मचाऱ्यांना बसायला भाग पाडले. काही लोकांच्या थोड्याफार समस्या घर टॅक्स वाढीच्या सोडविण्यात आल्याचे समजते. मात्र लाखोरी रोड ते आदर्श नगर या प्रभाग क्रमांक चार मध्ये नगरपंचायत ची कचरा गाडी या गेल्या आठवड्यापासून फिरणे बंद झाल्याने कचऱ्याचा गंभीर प्रश्न जनतेसमोर निर्माण झाला आहे. नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांनी आता तरी या प्रभागाकडे लक्ष द्यावे व कचरा गोळा करण्याच्या कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी ही आता जनता करीत आहे.

## बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिती गठितच्या तालुका अध्यक्षपदी शब्बीर काझी

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील बांधकाम कामगारांच्या हितासाठी स्थानिक संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली असून, बांधकाम कामगार व इतर कामगार कल्याणकारी शासकीय समितीवर श्री. शब्बीर रमजानभाई सय्यद (काझी) यांची इंदापूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. शब्बीर काझी हे सणसर सोसायटीचे माजी चेअरमन असून सामाजिक उपक्रमात नेहमीच अग्रेसर असतात. महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री व इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे मामा यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून त्यांनी सातत्याने कामगार व समाजहिताचे प्रश्न मार्गी लावले आहेत मुस्लिम समाजाच्या विकासकामांसाठी त्यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत आमदार दत्तात्रय भरणे यांच्या शिफारशीनुसार ही निवड करण्यात आली असल्याचे शब्बीरभाई काझी यांनी सांगितले.



समितीच्या स्थापनेमुळे बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या समस्या,हक्क व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होणार आहे. स्थानिक स्तरावर कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी ही समिती महत्त्वाची ठरणार असून,अध्यक्ष म्हणून श्री.शब्बीर सय्यद यांचे योगदान अपेक्षित आहे.

या निवडीमुळे कामगार संघटनांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या हक्कांसाठी ही समिती पुढील काळात महत्त्वाची भूमिका बजावेल,अशी अपेक्षा तालुक्यातील समाज बांधवांनी व्यक्त केली आहे.

## ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेला सलाम; दामाजी बालूरे यांचा गौरवपूर्ण सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/पांडुरंग कदम :** देवणी तालुक्यातील बोरोळ येथील रहिवासी व महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी संघटनेचे राज्याध्यक्ष दामाजी बालूरे यांच्या पत्नी सौ मंगला जगताप शिक्षिका यांचा दोघांचा सेवापूर्ती व ऋणनिर्देश सोहळा दि. २८ मार्च २०२६ रोजी उदगीर येथील ओम गार्डन पांढरे मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. शिक्षक, मान्यवर व विविध क्षेत्रातील प्रतिष्ठितांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.




दामाजी बालूरे यांनी शिक्षकी सेवेत केंद्रप्रमुख पदावर कार्यरत राहून तब्बल ३८ वर्षे ४ महिने सेवा बजावली. त्यांच्या या दीर्घ सेवाकाळात त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांना घडवले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी इंजिनिअर, डॉक्टर, पोलीस निरीक्षक तसेच विविध शासकीय अधिकारी बनले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थितांनी त्यांच्या समर्पित व निष्ठावान सेवेला विशेष उजाळा दिला.

या कार्यक्रमास लातूर जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्षा उषाताई संभाजी पाटील तळेगावकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, पंडितराव धुमाळ, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, शिवाजीराव हुडे, नगरसेवक विजय निटुरे, मुख्याध्यापक नवनाथ खुळे, शिक्षक यादव बालूरे, विविध कार्यकारी सोसायटी वलांडीचे चेअरमन व्यंकटराव पाटील, हरिभक्त जगताप महाराज, अण्णाराव जगताप, बालाजी बोबडे, सतीश जगताप, उमाकांत भंडारे यांच्यासह लातूर जिल्ह्यातील शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी व असंख्य शिक्षक वृंद उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दामाजी बालूरे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला असून त्यांनी अनेकांना प्रेरणा दिली असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी दामाजी बालूरे यांना पुढील आयुष्यासाठी सुख, समाधान व उत्तम आरोग्य लाभावे अशा शुभेच्छा दिल्या. तसेच सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष पद सांभाळत आम्हाला मार्गदर्शन करावे, अशी विनंती शिक्षण समितीच्या वतीने करण्यात आली.हा सेवापूर्ती सोहळा दामाजी बालूरे यांच्या कार्याचा सन्मान करणारा आणि शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी ठरला

## गाझियाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या कामाची उपाध्यक्षांसह शिस्थमंडळाने केली पाहणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असून, या दौऱ्यादरम्यान त्यांनी राम सुतार यांच्या गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याच्या कामाची पाहणी केली. मुंबईतील इंदू मिल येथे उभारल्या जाणाऱ्या या पुतळ्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

या पाहणीवेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय सेलचे पदाधिकारी व इतर शिष्टमंडळ उपस्थित होते. २०१८ साली या पुतळ्याच्या उभारणीचे कंत्राट



राम सुतार यांच्या कारखान्याला देण्यात आले होते. मात्र, २०२६ पर्यंत या प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्याने शासनाने किंमतीतील तफावत तातडीने कंत्राटदाराला देण्याची गरज असल्याचे अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात त्यांनी लवकरच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन प्रकल्पातील आर्थिक तफावत दूर करण्यासोबतच एमएमआरडीए कडून कंत्राटदारांना वेळेत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, ३५० फूट उंचीच्या या भव्य पुतळ्यापैकी सध्या सुमारे ५० फूट काम पूर्ण झाले आहे. पुतळ्याचे बूट आणि पॅंटचा काही भाग तयार झाला असून उर्वरित काम गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू आहे. हा प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.मात्र स्मारकाच्या कामाला २०२८ उजाडणार असल्याचे चित्र आहे.

या स्मारकाबाबत बोलताना अण्णा बनसोडे यांनी सांगितले की, इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक हे भविष्यात एक मोठे पर्यटन आणि प्रेरणास्थळ ठरणार आहे.

देश-विदेशातील लाखो अनुयायांसाठी हे केंद्र आकर्षणाचे ठिकाण ठरेल, तसेच बाबासाहेबांच्या विचारांचे जतन करणारे एक महत्त्वपूर्ण स्थळ म्हणूनही ते ओळखले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## लाखनीत अतिक्रमण हटाव मोहिमेत भेदभाव?

### गरिबांवर कारवाई, श्रीमंतांना मोकळीक – शासन नियम डावलल्याचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/ लाखनी तालुका प्रतिनिधी :** लाखनी - लाखनी शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने रस्ते मोकळे करण्याच्या नावाखाली कारवाई सुरू केली असली, तरी या कारवाईत सर्रास भेदभाव होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेषतः गरीब व लहान व्यावसायिकांच्या दुकानांवर बुलडोझर फिरवला जात असताना, मोठ्या व प्रभावशाली लोकांच्या अतिक्रमणांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र दिसून येत




आहे.

नियमांनुसार रस्त्याच्या मध्यभागापासून 30 मीटर अंतरातील अतिक्रमण हटविणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात हा नियम सर्वांवर समानपणे लागू न करता, निवडक कारवाई केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. काही ठिकाणी गरीबांचे छोटे व्यवसाय काही मिनिटांत जमीनदोस्त करण्यात आले, तर त्याच रस्त्यावर असलेल्या मोठ्या बांधकामांना हातही लावण्यात आलेला नाही.

या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. “आम्ही छोटा व्यवसाय करून कुटुंब चालवतो, आमच्यावरच कारवाई का?” असा सवाल बाधित नागरिक करत आहेत. प्रशासनाच्या या दुटप्पी भूमिकेमुळे लोकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांनी मागणी केली आहे की, अतिक्रमण हटाव मोहीम राबविताना कोणताही भेदभाव न करता सर्वांवर एकसमान नियम लागू करावेत. अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.सध्या लाखनीत अतिक्रमण हटाव मोहीम ही न्याय देणारी ठरते की अन्याय वाढवणारी, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## व्ही .आय .टी .एम . महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा उत्साहात ; विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी) : प्रकाश गवारे :** व्ही.आय.टी.एम. समाजकार्य व पत्रकारिता महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या एम.एस.डब्ल्यू. (MSW) आणि एम.जे. (MJ) अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील 2025 मध्ये यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य हेमंत दुगाने



सर होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी मिळवलेले शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता समाजहितासाठी उपयोगात आणावे, असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे, असा संदेशही त्यांनी दिला.

यावेळी विभाग प्रमुख प्रा. अशोक कुबडे सर, समाजकार्य विभागप्रमुख प्रा. सम्राट हटकर सर, मा. संघपाल कांबळे व शंतनू सोने यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान आणि अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा हा सोहळा एक उत्तम दाखला ठरला.

सोहळ्यास विद्यार्थ्यांसह पालक व महाविद्यालयीन शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## चंद्रकिरण नगरात श्रीमद् भागवत कथेचे आयोजन 2 एप्रिल पर्यंत

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** चंद्रकिरण नगर हुडकेश्वर येथील श्री हनुमान मंदिर पंच कमिटी च्यावतीने श्रीमद् भागवत कथेचे आयोजन 26 मार्चपासून तर 2 एप्रिल या दरम्यान करण्यात आलेले आहेत. ह. भ. प. अनंत महाराज, (पाखोडे शास्त्री) यांच्या मार्गदर्शनाखाली वस्तीतील सर्व नागरिकांनी श्रीमद् भागवत कथेचा रोज सायंकाळी ४ ते ७ च्या दरम्यान, श्रीमद् भागवत कथेचा भक्तांनी लाभ घ्यावा.आणि गोपाल काल्याचे किर्तन अनंत महाराज यांचे वाणीतून 2 एप्रिल रोजी



आयोजित केली असून लगेच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन श्री हनुमान मंदिर पंचकमेटीने केले आहे.

## अब्दुल सत्तारांचे 'मिशन बूथ'; सिल्लोडमध्ये शिवसेनेची बांधणी; मतदार नोंदणीसह संघटना बळकटीकरणासाठी कार्यकर्त्यांना सक्रिय होण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रातील निवडणुकांचे औचित्य साधून शिवसेना पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच गावपातळीवर प्रभावी नियोजन करावे, असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी केले. सिल्लोड येथील 'सेना भवन' (जनसंपर्क कार्यालय) येथे आयोजित शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.




या बैठकीस आमदार अब्दुल सत्तार, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख विलास पारकर, जिल्हाप्रमुख तथा उपमहापौर राजेंद्र जंजाळ, नगराध्यक्ष अब्दुल समीर, तालुकाप्रमुख केशवराव तायडे, उपजिल्हाप्रमुख देविदास लोखंडे आणि जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना आमदार सत्तार म्हणाले की, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनहितकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. आगामी निवडणुकांमध्ये प्रत्येक बूथवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी कार्यकर्त्यांमधील समन्वय आणि सक्रियता महत्त्वाची ठरेल." जिल्हा संपर्कप्रमुख विलास पारकर व उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनीही पक्ष विस्तारासाठी एकजुटीने काम करण्याच्या सूचना देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमाबाबतही यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांनी आपल्या परिसरातील 'बूथ लेव्हल ऑफिसर' (BLO) यांना सहकार्य करून आपली माहिती अचूक असल्याची खात्री करावी. नवीन नोंदणी, दुरुस्ती किंवा स्थलांतरित मतदारांच्या नोंदी वेळेत पूर्ण कराव्यात, जेणेकरून सुयोग्य मतदार यादी तयार होईल, असे आवाहन आमदार सत्तार यांनी यावेळी केले.

या बैठकीस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वासराव दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, सय्यद नासिर हुसेन, माजी सभापती रामदास पालोदकर, दुर्गाबाई पवार, राजूबाबा काळे, समी चाऊस, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, कृउबा समितीचे संचालक दामू अण्णा गव्हाणे, नानासाहेब रहाटे, जयराम चिंचपुरे, सतीश ताठे, रमेश लाठी, शेख जावेद, गुड्डू आप्पा नगरे, सुखदेव जाधव, डॉ. संजय जामकर, प्रा. मन्सूर कादरी, कौतिकराव मोरे, राजूमिया देशमुख, संजय डमाळे, राजेंद्र ठोंबरे, डॉ. विठ्ठल जाधव, अंबादास सपकाळ, सयाजीराव वाघ, मधुकर गवळी, अंबादास शिंदे, रुपेश जयस्वाल, कृष्णा बावस्कर, गणेश पाटील, गुलाबराव मिरगे, अक्षय मगर आदींसह तालुक्यातील सरपंच, पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात; तुपटाकळी येथील शेतमजुराच्या मुलाची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी /उमेश साखरकर :** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतीही ध्येय गाठता येते, याचे उत्तम उदाहरण तुपटाकळी येथील अदीत्य पुंडलिक यलदरे याने सिद्ध केले आहे. अत्यंत हलाखीच्या आणि अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातून आलेल्या अदीत्यची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली असून, सध्या त्याची नियुक्ती अकोला येथे झाली आहे. त्याच्या या यशाने संपूर्ण दिग्रस तालुक्यातून त्याचे अभिनंदन होत आहे.अदीत्यचे वडील पुंडलीक बाबाराव यलदरे हे अल्पभूधारक शेतकरी असून, घरखर्च चालवण्यासाठी ते शेतमजुरीही करतात. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असतानाही, मुलाच्या शिक्षणात कोणतीही कमतरता पडू नये, यासाठी वडिलांनी अतोनात कष्ट केले. वडिलांच्या घामाचे मोल ओळखून अदीत्यनेही लहाणपणापासूनच कष्टाला प्राधान्य दिले.पोलीस भरतीसाठी आवश्यक असलेल्या शारीरिक चाचणी आणि लेखी परीक्षेची तयारी करण्यासाठी महागडे क्लासेस लावणे अदीत्यच्या आर्थिक आवाक्याबाहेर होते. मात्र, परिस्थितीला दोष न देता त्याने ध्येयावर लक्ष केंद्रित केले. आपल्या घरच्याच परिसरात, उपलब्ध साधनांचा वापर करून त्याने कठोर सराव केला आणि लेखी परीक्षेसाठी रात्रंदिवस अभ्यास केला. प्रतिकूल परिस्थितीतही त्याने जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण केले.अदीत्यची पोलीस दलात निवड झाल्याची



बातमी समजताच तुपटाकळी गावात आनंदाचे वातावरण पसरले. ग्रामस्थांनी आणि त्याच्या मित्रपरिवाराने गुलालाची उधळण करत आणि पेढे वाटत या यशाचा जल्लोष केला. अदीत्यचे हे यश सध्या परिसरातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना अदीत्य म्हणाला की, "माझ्या या प्रवासात माझ्या आई-वडिलांचे कष्ट आणि कुटुंबाचा मोलाचा पाठिंबा आहे. त्यांनी मला कधीही आर्थिक अडचणींची जाणीव होऊ दिली नाही. त्यांच्या प्रेरणेमुळेच मी आज महाराष्ट्र पोलीस दलात भरती होऊ शकलो."

# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवानिमित्त ‘रामपर्व’ सोहळा उत्साहात; विविध कार्यक्रमाने रंगला सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ‘रामपर्व’ हा भव्य सांस्कृतिक सोहळा श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण-कोपर, माजी विद्यार्थी आणि सहकारी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठी गर्दी केली होती. संपूर्ण परिसर सांस्कृतिक वातावरणाने न्हाऊन निघाला होता. यावेळी माजी विद्यार्थी संघटना व श्री छत्रपती शिवाजी विद्यालय यांच्या वतीने 'रामपर्व पुरस्कार २०२६' मानपत्र देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सपत्नीक भव्य सन्मान करण्यात आला. या भव्य दिव्य सोहळ्यानिमित्त आयोजक, संयोजक, ग्रामस्थ, हितचिंतकांचे लोकनेते रामशेठ रामशेठ ठाकूर यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण-कोपर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य व स्थानिक स्कुल कमिटी चेअरमन अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते व जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख,कॉंगेसचे जिल्हाध्यक्ष व जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, भारताचे माजी कसोटीपटू निलेश कुलकर्णी, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.गणेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी पंचायत समिती सदस्य



भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालक अर्चना ठाकूर, ज्येष्ठ सहकारी बी. टी. कांबळे, मजीद सोलकर, एम. डी. खारकर,गोपीनाथ कोळी, हरीभाऊ देशमुख, एकनाथ देशमुख, गुलाब नाईक, मोरेश्वर देशमुख, वसंतशेठ पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, अनंता ठाकूर, विजय घरत, उत्तम कोळी, ॲड.राहुल घरत, विश्वनाथ कोळी, संजीव पाटील, मनोज आंग्रे, सी.एल. ठाकूर, योगिता भगत, सुहास भगत, राम मोकल, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, साईचरण म्हात्रे, किशोर कोळी, निलेश खारकर, वैभव घरत, कामिनी कोळी, सुधीर ठाकूर, धीरज ओवळेकर, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर रवींद्र भोईर, डी. बी. पाटील, संजीवनी म्हात्रे, कामोठे स्कुलच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, विलासराव लेंभे, शशिकला पाटील, सायली वडवलकर, प्रणिता गोळे, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांच्यासह आयोजक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय विविध मान्यवर, पदाधिकारी आणि रयत शिक्षण संस्थेचे सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘रामपर्व’ अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सादर झालेल्या नृत्य, संगीत, नाट्य आणि कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची महती यावेळी विशद करण्यात आली. माजी विद्यार्थ्यांसह आजी विद्यार्थी आणि गव्हाण विद्यालयाच्या शिक्षकांनी देखील नृत्याविष्कार सादर करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या प्रसंगाचे सादरीकरण केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील काही प्रसंगाच्या आठवणी सांगणाऱ्या त्यांच्या समकालीन व मित्रपरिवार आणि कुटुंबीय यांच्या प्रातिनिधिक मुलाखतींची ध्वनिचित्रफित यावेळी प्रदर्शित करण्यात आली. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या परीने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सहभाग नोंदवला. यावेळी नृत्याविष्कार, नाट्यविष्कार, भजन आदी विविध बहारदार आणि रसिकांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या कार्यक्रमांद्वारे कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी भाषण स्मित मोकल याने तर मानपत्र वाचन व सूत्रसंचालन सागर रंधवे व दर्शना माळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी, सहकारी, माजी विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग यांनी परिश्रम घेतले. एकूणच ‘रामपर्व’ हा सोहळा उत्साहात आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.

---

# दैनिक युवक आधारच्या बातमीचा इम्पॅक्ट अभय नगर मध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू

## शिवसेना उपविभाग प्रमुख श्री.दीपेश पाटील यांनी घेतली बातमीची दखल

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे महानगर पालिकेतील दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मधील अभय नगर मध्ये बऱ्याच दिवसापासून दूषित आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता वारंवार तक्रार करूनही अधिकारी वर्ग मात्र याकडे दुर्लक्ष करीत होते याबाबत दैनिक युवक आधारचे पत्रकार श्री.रमेश राऊत यांनी गुरुवार दिनांक २६ मार्च रोजी एक बातमी प्रसारित केली होती, या बातमीची दखल घेत शनिवार दिनांक २९ मार्च रोजी त्वरित नवीन पाईपलाईन






दैनिक युवक आधार
Epaper.YuvakAadhar.in
संपादक : श्री. संतोष शिवदास आमले
अकार्यक्षम अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजना मुळे अभय नगर मध्ये पाण्याचा तुटवडा; प्रशासनाच्या विरोधात नागरिक संतप्त

टाकण्याचे काम सुरू करण्यात आले यावेळी येथे शिवसेना(शिंदे गट)उपविभाग प्रमुख श्री. दीपेश पाटील, शाखाप्रमुख श्री. बाबुराव पाटील, श्री. जितेंद्र खुटारकर, श्री. किशोर दळवी, श्री. राजेश म्हामुणकर, श्री. संतोष फेपडे,श्री.राकेश सिंग आणि अभय नगर मधील बरेचसे नागरिक उपस्थित होते हे काम कोणाच्या निधीतून होत आहे हे अजून पर्यंत स्पष्ट झाले नाही जेव्हा ते स्पष्ट होईल त्यावेळेस सविस्तर बातमी प्रसारित करण्यात येईल नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू झाल्यामुळे अभय नगर मधील रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

# वार्तालाप कार्यक्रमात राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी शेअर केले व्हिजन

## जिल्ह्यातील एकही अंगणवाडी अंधारात राहणार नाही - राजिप अध्यक्ष, मंगेश वाकडीकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पनवेल मधील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने रविवार दिनांक २९ मार्च रोजी रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या समवेत वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मंचातील तमाम सदस्यांनी मंगेश वाकडीकर यांचा यावेळी सत्कार करून त्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**मी कॉर्पोरेट क्षेत्रात काम केलेले आहे, मला बँकिंग सेक्टरचा अनुभव आहे. अनेक जनकेंद्रित समाज उपयोगी उपक्रम राबविण्याचा मला अनुभव आहे. रायगड प्रीमियर लीग च्या अनुषंगाने क्रीडा क्षेत्राचा देखील मला अनुभव आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संघटन करण्यासाठी देखील मी सक्रिय आहे आणि यासोबतच मला लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, आमदार प्रशांत ठाकूर आमदार महेश बालदी यांच्यासह आमच्या सर्वच ज्येष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभले आहे. या पाठबळाच्या शिदोरीच्या जोरावर मी निश्चितच लक्षणीय कामगिरी करून दाखवेन. - मंगेश वाकडीकर**

मंगेश वाकडीकर यांनी अत्यंत विस्तृतपणे त्यांची कार्यपद्धती आणि व्हिजन हे मंचातील सदस्यांसमवेत शेअर केले. दोन दिवसांपूर्वी सादर केलेल्या अर्थसंकल्पाबाबत देखील मंगेश वाकडीकर यांनी विस्तृत विवेचन केले. या अर्थसंकल्पामध्ये जवळपास ७०० अंगणवाड्यांवरती विद्युत जोडणी न झाल्याचा मुद्दा अग्रस्थानी ठेवला असल्याचे त्यांनी सांगितले. हा मुद्दा आम्ही प्राधान्य क्रमाने हाती घेत जिल्ह्यामधील एकही अंगणवाडी अंधारात ठेवणार नाही असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.जल जीवन मिशन,जलदुर्ग संवर्धन, सागरी पर्यटनाला चालना, ऐतिहासिक वारसा स्थळांचे सुशोभीकरण, आरोग्य अशा विविध विषयांवर मंचातील सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर मंगेश वाकडीकर यांनी अत्यंत अध्ययनपूर्ण उत्तर देत त्यांच्यातल्या अभ्यासू वृत्तीची चुणूक दाखवली. सल्लागार मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले तर सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी आपले मनोगतातून मंगेश वाकडीकर यांना शुभेच्छा दिल्या.मंगेश वाकडीकर यांच्या समवेत संपन्न झालेल्या वार्तालाप कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार तथा सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, सरचिटणीस हरेश साठे, उपसचिव राजू गाडे, निलेश सोनावणे, प्रवीण मोहोकर, लालचंद यादव, सुनील राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

---

# चित्रपटसृष्टीत महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान ; नागपूर चित्रपट महोत्सवात विशेष चलचित्र चर्चा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : चित्रपटसृष्टीत महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान असून निर्मिती, दिग्दर्शन, संगीत, चित्रीकरण अशा विविध क्षेत्रात महिला संघर्षातून पुढे येत असल्याची माहिती तज्ञांनी विशेष सत्रात दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर चित्रपट महोत्सवात विशेष चलचित्र चर्चा रविवार, दि.२९ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. या चर्चेत सहभागी विविध क्षेत्रातील विषयतज्ञांनी आपली भूमिका मांडली.



माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात आयोजित चलचित्र चर्चेला विषय तज्ञ म्हणून डॉक्युमेंटरी फिल्म निर्माता व एडिटर अनुराधा सिंह, लेखिका तथा फिल्म निर्माता निधी सिंह धर्मा, पटकथा व संवाद लेखिका मनीषा कोरडे, कला दिग्दर्शक स्निग्धा कर्मेहे यांची उपस्थिती होती. विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची मुलाखत सुष्मिता सिंह यांनी घेतली. चित्रपट सृष्टीत संवाद लेखन, कथालेखन, संगीत, कॅमेरा, चित्रीकरण ते चित्रपट मार्केटिंग आदी विविध क्षेत्रात महिला पुढे येत आहेत. निधी सिंह धर्मा यांनी मिशन मंगल या चित्रपटातील विविध माहिती उपस्थितांना सांगितली. विद्या बालन यांच्या मुलाचा एका प्रसंगावर बोलताना त्यांनी एक पात्र साकारले. त्याच्या विविध पैलूवर कशाप्रकारे विचार केला जातो, त्याचे कुटुंबीय मित्रपरिवार, कामाचे ठिकाण आदी विविध संबंधित पात्रांची निर्मिती कशा प्रकारे होते आणि अनेक प्रसंग कशाप्रकारे येतात याबाबत त्यांनी विस्तृत माहिती दिली. एक पात्र साकार करताना त्याच्याविषयी अनेक दिवस लेखन करावे लागतात. चित्रपट सृष्टीत महिला म्हणून संघर्ष करावा लागतोच, या संघर्षातूनच अनुभवातून आपण बरेच काही शिकत असतो, असे निधी सिंह धर्मा यांनी सांगितले.

स्निग्धा कर्मेहे यांनी पूर्वी अभियंता किंवा मेडिकल याशिवाय दुसरे करिअर ऑप्शन नव्हते त्यामुळे मला देखील अभियंता अभ्यासक्रमाचे शिक्षण घ्यावे लागले अभियांत्रिकी चे शिक्षण घेतल्यानंतर नोकरी मिळाली नाही तर काय करावे असा प्रश्न समोर होता मला देखील अभियांत्रिकी क्षेत्रात विशेष रस नव्हता त्यामुळे फॅशन डिझायनिंग चे अभ्यासक्रम करीत एकटीच मुंबईला पोहोचली संघर्षातून चित्रपटसृष्टीत आपले स्थान निर्माण केले असे त्यांनी सांगितले.

अनुराधा सिंह यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर मास कम्युनिकेशन करीत एडिटिंग क्षेत्रात आपले करिअर निवडले. संवाद क्षेत्रात शिक्षण घेत असताना एडिटिंग विषयी त्यांना विशेष आवड निर्माण झाली. रेणू सनूजा या चित्रपट एडिटर यांच्याकडे सहएडिटर म्हणून कार्य करताना आलेले अनुभव यावेळी त्यांनी सांगितले. चित्रपटाचे संपादन करताना एक फुटेज १०० वेळा तपासावे लागतात. त्यातील संगीत, संवाद याविषयी विशेष लक्ष द्यावे लागते, असे त्यांनी सांगितले. याकरिता पुणे येथील संस्थेतील विशेष शिक्षण देखील घेतल्याचे त्यांनी सांगितले.

मनीषा कोरडे यांनी मानसशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर चित्रपटसृष्टीत पटकथा व संवाद लेखिका म्हणून कार्य करण्यास सुरुवात केली. आपणामध्ये सृजनता असेल तर आपण कोणत्याही क्षेत्रात आपले करिअर निवडू शकतो असे त्या म्हणाल्या. यावेळी तज्ञ व्यक्तींनी महिलांना कमी लेखू नका चित्रपटसृष्टीत संघर्षातून अनेक महिलांनी आपले स्थान निश्चित केले आहे. मेहनत करावी लागते. महिला म्हणून मोबदला कमी मिळत असला तरी आपल्या आवडीच्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी आपणास प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी ऑस्कर पुरस्कारासाठी कशाप्रकारे छाननी केली जाते तेथे पोहोचल्यानंतर आलेले विविध अनुभव यावेळी तज्ञांनी व्यक्त केले. चर्चासत्राला मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

*जाहिरात कला एक कौशल्य - साजन राज कुरुप*

नागपूर फिल्म फेस्टिवल मध्ये 'जाहिरात एक कला9 या विषयावर क्रिएटिव्ह लँड एशिया चे संस्थापक साजन राज कुरुप यांचे विशेष सत्र कोटा श्रीनिवास राव सभागृहात रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी पार पडले. यावेळी साजन राज कुरूप यांनी जाहिरात कलेबाबत विविध माहिती दिली. चित्रपटाच्या निर्मितीनंतर त्याचे मार्केटिंग अर्थात जाहिरात करणे गरजेचे असल्याचे सांगितले. जाहिरातीच्या माध्यमातून चित्रपट लोकांपर्यंत पोहोचतो असे साजन राज कुरूप यांनी सांगितले. या सोबतच विविध उत्पादनांच्या जाहिराती कशाप्रकारे निर्माण केल्या जातात त्यासाठी कशाप्रकारे पूर्वतयारी करावी लागते याची विस्तृत माहिती त्यांनी आपल्या सत्रात दिली. साजन राज कुरूप यांची मुलाखत महेंद्र पेंढारकर यांनी घेतली.

---

# कासाडी नदी पुन्हा एकदा काळ्या गडद रंगाच्या पाण्याने दूषित झाल्याचे आले समोर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर ) :** तळोजा परिसरातून वाहणारी कासाडी नदी पुन्हा एकदा काळ्या गडद रंगाच्या पाण्याने दूषित झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे येथील पर्यावरणीय स्थिती गंभीर बनली आहे. मध्य भागातून पश्चिमेकडे वाहणाऱ्या या नदीच्या पात्रात वारंवार औद्योगिक सांडपाणी सोडले जात असल्याचा आरोप केला जात आहे. नदीतील पाण्याचा रंग पूर्णपणे काळवंडल्याने या भागात प्राणवायूची पातळी मोठ्या प्रमाणात घटू लागली आहे. या प्रदूषित पाण्यामुळे नदीतील मासे व इतर जलचर जीव जवळपास नाहीसे झाल्याचे दिसून येत आहे. तर, काही ठिकाणी दुर्गंधी मोठ्या प्रमाणात वाढल्याने या भागातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होऊ लागली आहे. याविरोधात येथील नागरिकांनी संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही त्यावर ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याने नागरिक. आता कमालीचा संताप व्यक्त करू लागले आहेत. या नदीचे पाणी दिवसेंदिवस अधिक काळवंडत असतानाही संबंधित यंत्रणांकडून केवळ पाहणीचा देखावा उभा करून नदीचे पाणी काळवंडण्यामागचे खरे कारण दडवत असल्याचा आरोप आता येथील नागरिक करू लागले आहेत. तसेच या नदीच्या दूषित पाण्यामुळे भविष्यात या भागात एखादी मोठी दुर्घटना घडलीच तर, त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न येथील नागरिक उपस्थित करू लागले आहेत. दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी सतीश पडवळ यांनी या घटनेची दखल घेत 'तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल,' असे आश्वासन दिले आहे. मात्र, वारंवार घडत असलेल्या या घटनांमुळे कासाडी नदीचे अस्तित्व धोक्यात येत असल्याने येथे तातडीने ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी या भागातील **पर्यावरणप्रेमी करीत आहेत.**

---

# दुचाकी अपघातात चालकाचा मृत्यू ; सहप्रवासी जखमी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , ( वार्ताहर ) :** पनवेल खांदा कॉलनीकडून नवीन पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्ता दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. तर मागे बसलेला सहप्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली. खांदेश्वर पोलीस ठाण्यात याप्रकरणी स्कुटी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास करण्यात येत आहे.याबाबतचे वृत्त असे की, गंगाराम विश्वकर्मा (५०) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव असून ते नवीन पनवेल येथे राहत होते. गंगाराम हे त्यांच्या दुचाकीवरून राम भानसिंग कामी (४२) यांना घेऊन जात होते. त्यांची दुचाकी खांदा कॉलनी येथील उड्डाणपूल उतरून पुढे आली असता गंगाराम यांचा वाहनावरील ताबा सुट ल्याने त्यांची दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून हा अपघात झाला.या अपघातात गंगाराम व राम हे दोघेही जखमी झाले. त्यानंतर दोघांना वेगवेगळ्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र गंभीर जखमी असलेल्या गंगाराम विश्वकर्मा यांचा काही वेळात मृत्यू झाला.

तर राम कामी यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघाताला गंगाराम विश्वकर्मा हे कारणीभूत असल्याने खांदेश्वर पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि उत्तम घेगडमल करत आहेत.

# माँ मांडोदेवी धार्मिक पर्यटनस्थळाचे भव्य रूपांतरण घडविण्यास आम्ही कटिबद्ध - राज्य मंत्री एड. आशिष जायसवाल

## सामूहिक विवाह समिती दोन कुटुंबांचा वेळ व खर्च वाचवणारे महत्त्वाचे व्यासपीठ — आमदार विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या गोंदिया जिल्ह्यातील घनदाट जंगल आणि नैसर्गिक डोंगररांगा यांच्या कुशीत वसलेले माँ मांडोबाई देवस्थान, बघेडा/टेढा येथे रामनवमीच्या पावन पर्वावर लक्ष्यापेक्षा अधिक १९१ सर्वजातीय नवदांपत्यांनी माँ मांडोदेवीचे आशीर्वाद घेऊन नवीन वैवाहिक जीवनाची सुरुवात केली. या वर्षी हजारो भक्तांच्या उपस्थितीत हा सामूहिक विवाह सोहळा भक्तांच्या प्रचंड उत्साहाने सफल पार पडला.

मांडोबाई देवस्थानातील हा सलग ३४वा सर्वजातीय सामूहिक विवाह सोहळा असून तो २७ मार्च रोजी माँ मांडोबाईच्या कृपेने संपन्न झाला. नवदांपत्यांना आशीर्वाद देण्यासाठी राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन आणि कायदा-न्याय विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जायसवाल कुटुंबासह उपस्थित होते. त्याचप्रमाणे देवस्थानचे अध्यक्ष व गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल, आमगावचे आमदार संजय पुराम, माजी आमदार सहेसराम कोरोटे, हेमंतभाऊ पटले, खोमेशभाऊ रहांगडाले, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, पंस. गोंदिया सभापती मुनेश रहांगडाले, कृउबास सभापती भाऊराव ऊके, उषाताई मेंढे, सुरेंद्र नायडू, दीपाताई चंद्रिकापुरे, सविता अग्रवाल, चेतालीताई नागपुरे, सुमित भालोटिया, जीवनेश मिश्रा यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सामूहिक विवाह सोहळ्याबाबत देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, सर्वजातीय सामूहिक विवाहाची सुरुवात १९९३ पासून याच देवस्थानातून झाली आहे आणि हा सलग ३४वा वर्ष आहे. आजच्या काळात हा उपक्रम समाजातील अनेक कुटुंबांचा वेळ आणि खर्च वाचवणारा प्रभावी उपक्रम ठरत आहे. दरवर्षी विवाहगटकांची वाढती संख्या ही आयोजन समितीच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाची साक्ष आहे. आगामी काळात सर्व धर्मीय लोकांनी या उपक्रमांतर्गत विवाह नोंदणी करावी, असे




आवाहनही त्यांनी केले.

राज्यमंत्री ॲड. आशिष जायसवाल यांनी माँ मांडोदेवीला नमन करून नवदांपत्यांना आशीर्वाद दिले. हजारो भक्तांच्या उपस्थितीने भारावून जाऊन त्यांनी सांगितले की, मुंबईत असताना मांडोदेवी देवस्थानाबद्दल जे ऐकले, ते आज प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य लाभले. “या पवित्र देवस्थानाच्या भव्य विकासासाठी मी कटिबद्ध आहे. लवकरच मी दिवसाच्या वेळी संपूर्ण क्षेत्राची पाहणी करणार असून येथे कोणते विकासकाम करता येईल याचा आढावा घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात येईल,” असे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, “मी त्या जिल्ह्याचा जावई आहे जिथे माँ मांडोदेवी विराजमान आहे, हा माझा सन्मान आहे. या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे ही माझी प्राथमिकता आहे.”

सामूहिक विवाहात नवदांपत्यांना लग्नासाठी आवश्यक जीवनोपयोगी वस्तू, वस्त्र, तसेच सोन्याचे मंगलसूत्र प्रदान करण्यात आले. मोठ्या संख्येने भक्त उपस्थित असल्यामुळे पोलिस प्रशासनाने मुंडीपार–हरदौली मार्ग तसेच मंदिर परिसरात उत्कृष्ट व्यवस्था राखली, याबद्दल आयोजन समितीने आभार मानले.

या संपूर्ण सोहळ्याला यशस्वी करण्यात देवस्थानाचे अध्यक्ष आमदार विनोद अग्रवाल, सचिव डॉ. लक्ष्मण भगत, उपाध्यक्ष भैयालाल सिंदराम, कोषाध्यक्ष विश्वनाथ असाटी, सहसचिव कुशनजी घासले, सदस्य डॉ. जितेंद्र मेंढे, शालिकराम उईके, सखाराम सिंदराम, दिलीप खंडेलवाल, राहुल अग्रवाल, नंदकिशोर गौतम, तसेच मंदिराचे पुजारी पंडित अयोध्यादास महाराज, किशोर शेंडे, अमोल भारती आणि बघेडा (टेढा) येथील ग्रामस्थांचे अनन्यसाधारण योगदान राहिले. मंगलाष्टक नारायण बहेकार यांनी केले, तर संचालन जगणेश गुरुजी यांनी केले.

एक नजर इथंही...

मध्य भारतातील सर्वाधिक प्रसिद्ध धार्मिक पर्यटनस्थळ — सूर्यदेव मांडोबाई देवस्थान

दरवर्षी अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रमांसाठी सूर्यदेव मांडोदेवी संस्थेला महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा फुले–शाहू–आंबेडकर पुरस्कार प्रदान झाला आहे. सर्वधर्म समभाव आणि मानवकल्याणाच्या ध्येयाने हे देवस्थान मध्य भारतातील प्रमुख धार्मिक आणि पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.

दररोज हजारो भक्तांची उपस्थिती

मांडोदेवी देवस्थानात दररोज ३ ते ४ हजार भक्त दर्शनासाठी येतात. येथे ५० हून अधिक दुकाने आणि हॉटेल्स असल्याने या परिसराचे धार्मिक महत्त्व स्पष्ट होते.

हजारोंच्या संख्येने अंतरजातीय विवाह घडवणारी संस्था — मांडोबाई देवस्थान

प्रतिवर्ष आरोग्य शिबिर, मार्गदर्शन शिबिरे, तसेच नियमित विवाह सुविधा उपलब्ध असल्याने ही संस्था सामाजिक न्यायाची सशक्त उदाहरण ठरली आहे. आजपर्यंत हजारो विवाह, त्यातही मोठ्या प्रमाणावर अंतरजातीय विवाह येथे पार पडले आहेत. तसेच प्राचीन मांडोदेवी मंदिर भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे म्हणून प्रसिद्ध आहे.

---

# दिग्रस मध्ये अवैध गॅस साठ्यावर मोठी कारवाई; राजु शाम पदमावार यांच्या कडे मिळाले १२ गॅस सिलेंडर

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर** : २८मार्च रोजी एका इसमाकडुन १२ सिलेंडर जप्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार दिग्रस शहरात अवैध धंदे अवैध गॅस सिलेंडर साठवणूक व माहीत काढत असताना दुपारी तीन वाजता च्या सुमारास माहिती मिळाली दिग्रस शहरातील ब्राह्मणपुरी राष्ट्रीय विद्यालय दिग्रस येथील राजु शाम पदमावार हा स्वःताच्या घरी अवैध गॅस साठवणूक त्याची स्वःताच्या मर्जी ने विक्री करीत आहे अशी गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने पोलिसांनी पुरवठा निरीक्षक दिग्रस तसेच पचांसह छापा कारवाई केली असता राजु शाम पदमावार यांच्या घरी अवैध व्यवसायीक दहा सिलेंडर व छोटे दोन असे १२सिलेडर



रेग्युलेटर चार वजन काटा एक अवैध रीत्या ताब्यात घेतल्याने राजु शाम पदमावार रा.ब्रम्हणपुरी दिग्रस यांच्या कडे सदर सिलेंडर, रेग्युलेटर, वजन काटा पंचसमक्ष विचारपूस केली असता नमुद इसमाने उडवाउडवीची उत्तरे दिली कोणत्याही प्रकारचे दस्तावेज सादर केले नसल्याने गॅस सिलेंडर अवैध रीत्या साठवणूक करून आल्याने लहान,मोठे १२ सिलेंडर मिळुन आल्याने एकुण ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेऊन निरक्षक अधिकारी तसेच पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय दिग्रस हे पुढील कारवाई करीत आहे याद्वारे दिग्रस शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत की गॅस सिलेंडर चा अवैध साठा कोणी करू नये कुणी साठवणूक करून जादा दराने विक्री करीत असेल तर पुरवठा विभाग, पोलीस स्टेशन ला कळवावे प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल सदरची कारवाई कुमार चिंता यवतमाळ,अप्पर पो.अधिक्षक थोरात, डॉ सिद्धेश्वर भोरे दारव्हा, डॉ .तेजस सारडा दिग्रस यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे.

# भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ विदर्भ रत्न पुरस्काराने सन्मानित !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे /आकोट प्रतिनिधी :-** संत वासुदेवजी महाराज यांच्या संस्कारांचा वसा आणि वारसा समर्थपणे जपत गेल्या ३८ वर्षांपासून बालसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनींना सुसंस्कारीत करण्याचे कार्य करणारे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांना 'विदर्भ रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री भागवत समिती तथा श्री महादेव संस्थान, उरळ बु. यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम नवमीच्या पर्वकाळात आयोजित कार्यक्रमात गोपाळ महाराज उरळकर यांच्या हस्ते हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा सन्मान करण्यात आला.

यावेळी गोपाळ महाराज उरळकर यांनी ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, वाघ महाराज हे संत वासुदेव महाराज यांच्या शिष्य परंपरेतील एक



अनमोल रत्न आहेत.

आपल्या परखड शैलीतून आणि निष्ठेने ते संत परंपरेचा वारसा समर्थपणे पुढे नेत असून समाजात संस्कारक्षम कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'विदर्भ रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना ज्ञानेश्वर वाघ म्हणाले की, हा सन्मान माझा नसून वारकरी संप्रदायातील सेवाभावाचा आणि सेवाधाऱ्यांचा गौरव आहे. वारकरी परंपरेतून समाजात संस्कार व मूल्ये रुजविण्याचे कार्य पुढेही सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

---

# २२ वी राष्ट्रीय जम्प-रोप स्पर्धा मध्ये महाराष्ट्राला दुहेरी मुकुट

**युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : नाशिक जिल्हा जम्प-रोप असोसिएशन, महाराष्ट्र जम्प-रोप असोसिएशन यांच्या वतीने आणि डी. एस.एफ., नाशिक यांच्या सहकार्याने नाशिकमध्ये २२ व्या राष्ट्रीय जम्प-रोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा आज शानदार समारोप झाला.

जेष्ठ क्रीडा संघटक चंद्रशेखर सिंग यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत यजमान महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करून या स्पर्धेवर आपले वर्चस्व सिद्ध केले. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी विविध वैयक्तिक प्रकारात चांगली कामगिरी करत पदकांची लयलूट केली, तर डेमो या सांघिक प्रकारातही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एकमेकांमध्ये चांगला समन्वय राखत सुंदर डेमो पेश करत



२७ गुणांसह डेमो प्रकारातही सुवर्णपदक पटकावले. डेमो प्रकारात दिल्लीच्या संघाने दुसरे तर मध्यप्रदेश संघाने तिसरे स्थान मिळविले. महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या या एकत्रित प्रत्यनामुळे महाराष्ट्राने ६४ गुणांसह या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपदावर आपले नांव कोरले. दिल्लीच्या खेळाडूंनी चांगला प्रयत्न करून ४८ गुण मिळवत द्वितीय स्थान पटकावले, तर हरियाणा संघाच्या खेळाडूंनीही उत्तम कामगिरी करत २९ गुणांसह तिसरे स्थान मिळविले.विजेत्या खेळाडूंना प्रमुख पाहुणे वैष्णवी डेव्हलपर्स तथा, वानखेडे रिऍलिटी प्रा. लि.चे चेअरमन उमेश वानखडे,आर. डी. ग्रुपचे संचालक तथा नाशिक जिल्हा ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देशमुख यांच्या हस्ते आणि छत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक दुधारे, राजू शिंदे, दीपक निकम, अशोक कदम आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आकर्षक चषक आणि मेडल्स प्रदान करून गौरवण्यात आले. यावेळी बोलतांना उमेश वानखडे यांनी सांगितले की, खेळाडूंनी आपल्या खेळाच्या माध्यमातून आपल्या देशाचे नांव जगभरात उंच करावे असे सांगून विजेत्या खेळाडूंसह सर्व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक दुधारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक निकम यांनी केले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजू शिंदे, विक्रम दुधारे, दीपक निकम, तन्मय कर्णिक, अविनाश वाघ, आनंद चकोर, ज्योती निकम यांच्यासह नाशिक जिल्हा आणि राज्याचे संघटक, कार्यकर्ते परिश्रम घेतले.

# दादर—रत्नागिरी पॅसेंजर गाडीच्या प्रश्नावर खासदार वायकर यांच्याशी चर्चा

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : कोकणातील रेल्वे प्रवाशांच्या दैनंदिन अडचणींबाबत सातत्याने आवाज उठवणाऱ्या कोकण विकास समितीच्या शिष्टमंडळाने आज महत्त्वाची बैठक घेतली. समितीचे अध्यक्ष मा. जयवंत दरेकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई उत्तर पश्चिम जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार मा. श्री. रविंद्र दत्ताराम वायकर यांची भेट घेऊन दादर–रत्नागिरी पॅसेंजर गाडीच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी शिष्टमंडळाने दादर–रत्नागिरी पॅसेंजर गाडीची अनियमितता, वेळापत्रकातील बदल, तसेच प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी यांचा मुद्देसूद आढावा मांडला. विशेषतः कोकणातील प्रवासी, विद्यार्थी, नोकरदार आणि व्यापारी वर्गासाठी ही गाडी अत्यंत



महत्त्वाची असून, तिच्या सेवेतील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे नमूद करण्यात आले.

समितीच्या वतीने गाडी नियमित वेळापत्रकानुसार सुरू ठेवावी, आवश्यक त्या ठिकाणी थांबे वाढवावेत, तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी डब्यांची संख्या वाढवावी, अशा प्रमुख मागण्या खासदार वायकर यांच्यासमोर मांडण्यात आल्या. यासोबतच कोकण रेल्वे मार्गावरील इतर काही प्रलंबित प्रश्नांवरही चर्चा झाली.

खासदार रविंद्र वायकर यांनी शिष्टमंडळाच्या मागण्यांची दखल घेत लवकरच संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कोकणातील प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत उपस्थित सदस्यांनी कोकणातील रेल्वे सेवेत सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, प्रवाशांच्या हितासाठी पुढील काळातही अशा प्रकारे पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला.

या शिष्टमंडळात कोकण विकास समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान सकारात्मक वातावरणात चर्चा होऊन लवकरच या प्रश्नावर ठोस निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली

---

# उदगीरात गॅस वितरकांचा मनमानी कारभार ; सर्वसामान्य नागरिक वेठीस !

### गॅसची काळया बाजारात विक्री ९३७ रुपये ची पावती ग्राहकांना १००० रुपये घेत असल्याचे चित्र दिसत आहे व हॉटेल वाल्यांना १५०० रुपयाना गॅस विक्रेते विकत आहेत या गोष्टी उदगीर भागात होत असल्याची चर्चा; प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**लातूर जिल्हा प्रतिनिधी** : उदगीर शहरासह ग्रामीण भागात गॅस सिलिंडरच्या वितरणावरून नागरिकांमध्ये मोठा संताप व्यक्त होत आहे. येथील 'उदयगिरी गॅस एजन्सी'च्या व मनोज गॅस एजन्सी ढिसाळ नियोजनामुळे आणि मनमानी कारभारामुळे ग्राहकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे वेळेवर बुकिंग होत नाही, तर दुसरीकडे बुकिंग होऊनही १२-१४ दिवस गॅस मिळत नसल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले आहे.मुख्य समस्या आणि तक्रारी:काळा बाजार: एजन्सीकडून गॅस सिलिंडरची चढ्या दराने हॉटेल, इडली दोसा गाडे काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. हक्काचा गॅस मिळवण्यासाठी सर्वसामान्य रांगेत उभे असताना, दुसरीकडे मात्र अवैध विक्री होत असल्याचा संशय व्यक्त होत आहे.वितरणात विलंब: गॅस बुकिंग केल्यानंतर नियमानुसार दोन ते तीन दिवसांत वितरण होणे अपेक्षित असताना, ग्राहकांना १२ ते १४ दिवस वाट पाहावी लागत आहे.प्रशासनाचे दुर्लक्ष: गॅस एजन्सीच्या या मनमानी कारभाराकडे संबंधित पुरवठा विभाग आणि प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळेच एजन्सी मालकांचे धाडस वाढत चालल्याचा आरोप नागरिक करत आहेत.नागरिकांची मागणी:या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन प्रशासनाने उदयगिरी गॅस एजन्सी व मनोज गॅस एजन्सी च्या कारभाराची सखोल चौकशी करावी. ज्या ग्राहकांनी बुकिंग केले आहे, त्यांना तात्काळ गॅस उपलब्ध करून देण्यात यावा आणि काळ्या बाजारात सिलिंडर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्रस्त नागरिकांकडून होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नगराध्यक्षा विश्रांतीताई कदम यांच्याकडून शहराला पाणीपुरवठा टँकरची भेट



**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते** : मुदखेड शहरातील पाणीटंचाई लक्षात घेऊन नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधवराव कदम यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसाचे औचित्य साधत सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबवला आहे. अनावश्यक खर्च टाळून त्यांनी स्वखर्चातून पाणीपुरवठा टँकरची सुविधा उपलब्ध करून देत टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

आज सकाळी सुमारे ११:०० वाजता श्री कालीजी देवी मंदिर येथे नगराध्यक्षा कदम यांनी सहकुटुंब देवीचे दर्शन घेतले. विधिवत पूजन केल्यानंतर पाणी टँकरचे लोकार्पण करण्यात आले. मंदिर परिसरातून टँकरला हिरवा झेंडा दाखवून शहरातील पाणीटंचाई भासत असलेल्या भागांकडे रवाना करण्यात आले.

मुदखेड शहरात सर्वसाधारणपणे पाणीपुरवठा सुरू असला तरी काही भागांत टंचाई जाणवत होती. त्यामुळे लग्नाच्या वाढदिवसावर खर्च करण्याऐवजी तो निधी जनकल्याणासाठी वापरण्याचा निर्णय कदम कुटुंबाने घेतला. या उपक्रमांतर्गत टंचाईग्रस्त भागांमध्ये नागरिकांना मोफत पाणीपुरवठा केला जाणार आहे.

“लग्नाचा वाढदिवस हा आनंदाचा क्षण असतो; पण तो आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान पाहून अधिक वाढतो. शहराची सेवा करणे हेच आमचे पहिले कर्तव्य आहे,” असे मत नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधवराव कदम यांनी व्यक्त केले. या सर्व उपक्रमांमुळे शहरात समाधान व्यक्त होत असून नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

# ऊर्जा परिवर्तनातून स्वस्त, शाश्वत विजेकडे वाटचाल; महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा परिवर्तनाद्वारे विद्युत क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. त्यातून स्वस्त व शाश्वत विजेकडे वाटचाल सुरु झाली आहे. या कामगिरीचा सन्मान म्हणून नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. २८) स्कोच समूहाच्या वतीने महावितरणला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे व कार्यकारी अभियंता श्री. रोहित जोगदंड यांनी हा पुरस्कार स्विकारला.



महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे. यात सन २०२९-३० पर्यंत सर्व वर्गवारीतील वीज दर कमी करण्यास मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅनला अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांची ‘मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०’ सुरु करण्यात आली. या योजनेतून ११ लाख ५६ हजार आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून ८ लाख ८० हजार अशा एकूण २० लाख ३६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ५ लाख २ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १९०४ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे व त्यांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.नवी दिल्ली येथील स्कोच समूहाच्या वतीने ऊर्जा परिवर्तनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरणला पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# मथुरादास मोहोता विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेची नवीन समिती गठीत

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत/ प्रतिनिधी** : मथुरादास मोहोता विज्ञान महाविद्यालय नागपूर या संस्थेची माजी विद्यार्थी संघटनेची नवीन कार्यकारिणी दिनांक २९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गठीत करण्यात आली.२०२६ ते २०२९ पर्यंत ही समिती कार्यरत राहील. अध्यक्ष: एड. विलास अढाऊ उपाध्यक्ष: शेखर चहांदे आणि राम ठोंबरे सचिव: धम्मप्रकाश वैद्य सहसचिव: एड.हेमंत भोंडगे ,डॉ सुरेश गुप्ता ,अभय पोहणे कोषाध्यक्ष: सचिन वरगंट्टीवर कार्यकारि




सदस्य डॉ सुनिल भगत,डॉ साधना थोटे ,संजय शेंडे ,,श्रीधर चौहान ,राजेश समर्थ ,शिव मेहेर ,विजय बेलसरे ,राजेश गायधने ,,रंजना मुजुमदार ,डॉ जितेंद्र रामटेके, डॉ सतीश गोस्वामी आणि डॉ मधुकर धोंडे यांनी निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहिले. एड विलास अढाऊ यांनी अहवाल सादर केला. डॉ एमडी पवार यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण यावर प्रकाश टाकला.मावळते अध्यक्ष श्री सतीश दंडे यांचे मार्गदर्शन पर व्याख्यान झाले.

कार्यक्रमाची सांगता अल्पोपहार आणि गीत संगीत सादर करून झाली. डॉ जीवन दोंतुलवार, प्राचार्य मथुरादास मोहोता महाविद्यालय नागपूर यांचे सहकार्य लाभले.

# माणगाव: गुरुद्वारा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या बांधकामाचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार माणगांव रायगड** : माणगाव येथे प्रस्तावित गुरुद्वारा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या बांधकामाचा 'आरंभता अरदास' २५ मार्च रोजी भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.यावेळी श्रीमती यशोधरा गोडबोले यांच्या कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात जपजी साहिब पठण करून महान सेवेचा संकल्प सोडण्यात आला.

याप्रसंगी कॅप्टन निर्मल सिंग रंधावा, श्रीमती मीनू गिल, श्रीमती पूजा रंधावा, वीरेंद्र सिंग बर्मन, सुरेंद्र सिंग भाटिया आणि कविता तांबे उपस्थित होते.यावेळी श्रीमती यशोधरा गोडबोले



यांनी नाश्ता लंगरची, तर श्री सुरेंद्र सिंग बर्मन यांनी कढाह प्रसादाची सेवा दिली. गुरुद्वारा फाउंडेशनतर्फे भाविकांना या पवित्र कार्यासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेची खोरोची शाखेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : प्रहार दिव्यांग क्रांती संघटना इंदापूर तालुका व शहर यांच्या वतीने खोरोची येथे शाखेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास पुणे जिल्हाध्यक्ष शरद जाधव, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दिवेकर अण्णा, इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड,तालुका महिला अध्यक्ष सूक्षला ढाणे, तालुका सचिव रामदास चव्हाण,तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार,तालुका महिला उपाध्यक्ष रूपालीताई जगताप,तालुका खजिनदार भारत शेंडे, तालुका सहखजिनदार युनुस शेख, तालुका संपर्कप्रमुख महेश्वर जगताप,दौंड तालुका संघटक दादा ढमे उपस्थित होते.

खोरोची शाखेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्षपदी मनीषाताई नगरे, उपाध्यक्षपदी उर्मिलाताई पाटील,सचिवपदी राजन नगरे,सहसचिवपदी ताई मदने,खजिनदारपदी राजेंद्र चव्हाण,सहखजिनदारपदी अरविंद कदम यांची निवड करण्यात आली.सदस्य म्हणून रियाज मुलानी,सचिन हेगडकर,माया कुंभार,राजेंद्र किसवे,सागर कदम,सुरज जाधव,लखन जाधव, सोमनाथ मोरे,प्रणिता देवकर, विघ्नेश हेगडकर यांचा समावेश आहे.सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांचा सहभाग या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते संजय भाऊ चव्हाण,माजी सरपंच राजू भाळे,राहुल कांबळे, सतीश काका हेगडकर, ग्रामपंचायत सदस्य विशाल देवकर,सौ. अर्चना गोरड, महिला बचत गटातील आस्मा मुलानी,अरुणा साठे,शोभा भोसले,सुरेखा नगरे,गौरी भोसले तसेच आरोग्यसेविका मोहिनी मिसाळ उपस्थित होत्या.या शाखेच्या स्थापनेमुळे दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना अधिक बळ मिळणार असून संघटनेचे कार्य गावागावात पोहोचेल,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.उपस्थित मान्यवरांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्याला पाठबळ देण्याचे अहवान केले.

# अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाला राज्यात 'ई-गव्हर्नन्स' मध्ये तृतीय क्रमांक; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ (अकोला):** महाराष्ट्र शासनातर्फे राज्यभरातील शासकीय कार्यालयांमध्ये डिजिटल सेवांचा वापर वाढवण्यासाठी राबविण्यात आलेल्या "१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रम" या विशेष मोहिमेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या यशाबद्दल राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांना प्रशस्तिपत्र प्रदान करून यथोचित गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील विविध शासकीय कार्यालयांमध्ये १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या



मोहिमेमध्ये सहभागी कार्यालयांचे खालील सात मुख्य घटकांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले:

१. कार्यालयाचे संकेतस्थळ (Web-site)

२. 'आपले सरकार' प्रणालीची अंमलबजावणी

३. ई-ऑफिस (e-Office) चा वापर

४. कार्यालयाचा डॅशबोर्ड (Dash-board)

५. व्हॉट्सॲप चॅटबॉट (WhatsApp Chatbot) सुविधा

६. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर

७. भौगोलिक माहिती प्रणाली (GIS - Geographic Information System) चा वापर

या विशेष मोहिमेअंतर्गत राज्यातील एकूण ३४ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांची दोन टप्प्यांत कसून तपासणी आणि मूल्यमापन करण्यात आले. या कढ्या स्पर्धेत "पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला" हे कार्यालय सातही निकषांवर सरस ठरत राज्यात "तृतीय क्रमांकाने" विजयी झाले आहे.

मुंबई येथे आयोजित एका विशेष समारंभात, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अकोला पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक आणि त्यांच्या संपूर्ण चमूचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान केला. यावेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. या प्रशस्तिपत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.अकोला पोलिसांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या डिजिटल उपक्रमांमुळे पोलीस दलाची कार्यक्षमता वाढण्यास आणि नागरिकांना अधिक सुलभ व पारदर्शक सेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# आय एस टी डी नवी मुंबईतर्फे भविष्यातील कामाचे स्वरूप आणि शिक्षण विषयावर एकदिवसीय कॉन्फरन्स आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई, प्रतिनिधी** : इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट, नवी मुंबई यांच्या वतीने, भारती विद्यापीठ (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी), व्यवस्थापन अभ्यास विभाग, नवी मुंबई यांच्या सहकार्याने दि. २८ मार्च २०२६ रोजी कॉन्फरन्स २०२६ यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.

या परिषदेला डॉ. ज्योत्स्ना पडियार (आयएएस), आयुक्त – अर्थ व सांख्यिकी, महाराष्ट्र शासन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले, तर व्ही व्ही. सूर्य राव, सल्लागार – रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड हे मान्यवर पाहुणे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. वैशाली पाटील, अध्यक्षा, आय एस टी डी नवी मुंबई चॅप्टर आणि डॉ. प्रेमसिश रॉय,



संचालक, व्यवस्थापन अभ्यास विभाग, बी व्हि डी यू,खारघर यांनी केले.

या परिषदेत नितुल ओझा, डॉ. रिचा भार्गव, डॉ. निलय याज्ञिक, महेश गंभीर, ममता शर्मा, मृन्मय जाना, रंजना सेन, चारुदत्त पांडे आणि रवी बाविस्कर या मान्यवरांनी “ “कामकाज व शिक्षणाचे भविष्य: कृत्रिम बुद्धिमत्ता, रोजगारक्षमता, कल्याण आणि जागतिक बदल” या विषयावर आपले विचार मांडले.

परिषदेत ८० पेक्षा अधिक प्राध्यापक, पीएच.डी. संशोधक आणि व्यवस्थापन पदवीधरांनी आपले संशोधन सादर केले.

आधुनिक कार्यक्षेत्र आणि शिक्षण प्रणालीतील बदलत्या प्रवाहांवर लक्ष केंद्रित करत, या परिषदेमुळे शैक्षणिक तज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ञ, संशोधक आणि विद्यार्थ्यांना एकत्र येऊन विचारमंथन करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले. विविध सत्रे आणि पॅनेल चर्चांमधून डिजिटल परिवर्तन, कौशल्य विकास, सतत शिक्षण आणि बदलत्या जागतिक परिस्थितीत जुळवून घेण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच भविष्यातील कामकाजासाठी उद्योजकीय दृष्टिकोन आणि तांत्रिक तयारीची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

डॉ. कुलदीप भालेराव, सचिव, आय एस टी डी नवी मुंबई यांनी डॉ. डी. वाय. पाटील, डॅनियल कुरियन आणि नील रमेश यांचे मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. तसेच डॉ. वैशाली पाटील, डॉ. एन. महेश, इमॅन्युअल जोसेफ, महेश गंभीर, डॉ. फिलिप कॅसी, डॉ. स्वाती पडोसी, प्रा. अंशुल शर्मा आणि डॉ. नेहा शर्मा यांच्या उत्कृष्ट संघभावनेचे विशेष कौतुक केले.

या परिषदेत आय एस टी डी सदस्य, संशोधक, उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक आणि व्यवस्थापन विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला, ज्यामुळे ही परिषद ज्ञानविनिमय आणि सहकार्याचे प्रभावी व्यासपीठ ठरली.


आयोजकांनी सर्व वक्ते, सहभागी आणि सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# पालोद येथे हनुमान जयंतीनिमित्त 'रुद्र अभिषेक' व महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड**:- तालुक्यातील पालोद येथील ग्रामदैवत मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्सवाचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे हे प्रथम वर्ष असून, समस्त पालोद ग्रामस्थ मंडळींच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवांतर्गत बुधवार, दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी मंदिरात विधिवत 'रुद्र अभिषेक' आणि धार्मिक अनुष्ठान संपन्न होणार आहे. त्यानंतर गुरुवार, दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता भाविकांसाठी भव्य 'महाप्रसादाचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सदर धार्मिक कार्यक्रम पालोद येथील मारुती मंदिराजवळ पार पडणार आहेत. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या मंगलप्रसंगी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'समस्त पालोद ग्रामस्थ मंडळी' यांच्या वतीने

# अखिल भारतीय नवराज्य निर्माण महासंघाचे उपाध्यक्ष मेट्टा रामा राव यांचे अमरावती नगरीत विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने उस्फूर्त स्वागत

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : भारतातील घटक राज्यात सुशासन, सुरक्षा आणि संतुलीत विकास साध्य करण्यासाठी लहान राज्यांची निर्मिती ही काळाची गरज असल्याचे एकमेव ध्येय समोर ठेऊन गठीत झालेल्या *अखिल भारतीय नवराज्य निर्माण महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मेट्टा रामा राव* यांचे आज दिनांक २९ मार्च २०२६रोजी अंबानगरी अमरावती मध्ये विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या प्रदेशाध्यक्ष *श्रीमती रंजनाताई मामर्डे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ पृथ्वीराजसिंह राजपूत, कोअर कमिटी मेंबर डॉ पद्माताई राजपूत* यांनी उस्फूर्त स्वागत केले. या प्रसंगी *प्रा. डॉ. प्रशांत विघे, प्रा. डॉ. लाभेश साबळे व प्रा. डॉ. पंडित काळे* प्रामुख्याने उपस्थित होते. मेट्टा रामा राव यांचे दिनांक ३० मार्च २०२६ रोजी, भारतीय महाविद्यालय अमरावती द्वारा आयोजीत राष्ट्रीय परिषदेत *देशातील प्रादेशिक असमतोल* या विषयावर *बीजभाषण* होणार आहे.



श्रीमती रंजनाताई मामर्डे, डॉ. पी. आर. राजपूत, डॉ. पद्माताई राजपूत यांची मेट्टा रामा राव यांच्यासोबत आज अनौपचारिक चर्चा झाली. यावेळी रामा राव यांनी पृथक विदर्भ राज्याच्या संघर्ष यात्रेत नवराज्य निर्माण महासंघ सदैव वैदर्भीयांसोबत असल्याचे सांगितले आणि विदर्भाचे स्वतंत्र राज्य होणारच, त्याला आता कोणीही थांबवू शकणार नाही असे ठामपणे मत व्यक्त केले.

# "साहेब, आमचे संसार वाचवा..!" अन्वीत ८० वर्षीय आजींचा टाहो

## ग्रामसभेत महिलांची वज्रमूठ; अवैध दारूविक्रीविरोधात ऐतिहासिक ठराव मंजूर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** "साहेब, या वयात मी तुमच्यासमोर पदर पसरते, पण गावातील अवैध दारू कायमची बंद करा. आमची तरुण मुले व्यसनाच्या आहारी जात आहेत, संसार उघड्यावर आलेत; या संकटातून आम्हाला बाहेर काढा..." ८० वर्षीय सोनाबाई गायकवाड या माऊलीचा हा आर्त टाहो अन्वी (ता. सिल्लोड) येथील विशेष ग्रामसभेत उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या काळजाला भिडला. केवळ कागदोपत्री ठराव नको, तर 'महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९' मधील कडक तरतुदींनुसार प्रत्यक्ष जमिनीवर कठोर कारवाई व्हावी, असा आक्रमक पवित्रा घेत अन्वी ग्रामस्थांनी 'पूर्ण दारूमुक्ती'चा कायदेशीर निर्धार केला आहे.





सिल्लोड तालुक्यातील अन्वी परिसरात गेल्या काही काळापासून छुप्या मार्गाने चालणाऱ्या कथित अवैध दारूविक्रीमुळे सामाजिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. या पार्श्वभूमीवर, महादेव मंदिराजवळ कायदेशीर तरतुदींनुसार विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक नारायण मुंजाळ, पोलीस निरीक्षक मनीष जाधव आणि बीट जमादार सतीश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

> **"दारूमुळे गावातील कित्येक महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत अडकल्याने गावाची अख्खी पिढी बरबाद होत आहे. जोपर्यंत गावातली दारू पूर्णपणे बंद होत नाही, तोपर्यंत आमचा हा लढा कायदेशीर आणि सनदशीर मार्गाने सुरूच राहील."**
> **— सोनाबाई हिरामण गायकवाड (ज्येष्ठ महिला, अन्वी)**

सभेच्या सुरुवातीलाच संतप्त महिलांनी प्रशासकीय यंत्रणेला प्रश्नांच्या सरबत्तीने धारेवर धरले. "अवैध विक्री केंद्रे कोणाच्या वरदहस्ताने चालतात?" असा थेट सवाल करत महिलांनी उपस्थित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. चर्चेदरम्यान सोनाबाई हिरामण गायकवाड या ज्येष्ठ माऊलीने थेट अधिकाऱ्यांच्या समोर येत हात जोडले आणि साश्रू नयनांनी पदर पसरला. आजींचा हा आक्रोश पाहून सभेचे वातावरण कमालीचे गंभीर झाले होते.

यावेळी ग्रामसभेने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील अधिकारांचा वापर करून, गावात यापुढे कोणत्याही प्रकारचे अवैध मद्य उत्पादन, साठवणूक व विक्री होणार नाही, असा सर्वानुमते ठराव मंजूर केला. अशा समाजविघातक कृत्यांना कोणाचेही सामाजिक किंवा राजकीय पाठबळ दिले जाणार नाही, असा सज्जड इशाराही ग्रामस्थांनी दिला. उपस्थित पोलीस व उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी या ठरावाची प्रत स्वीकारून, अवैध धंद्यांवर कायद्याचा बडगा उगारण्याचे आणि गस्त वाढवण्याचे ठोस आश्वासन दिले.

# पनवेल-अलिबाग एसटी बससेवा: रात्री ८ नंतर प्रवाशांचे हाल

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : पनवेलहून अलिबागला यायला रात्री ८ ते ८.३० शेवटची बस त्यानंतर बाहेरून येतील त्या गाडीवर अवलंबून रहावे लागते रेवदंडा, मुरुड साठी पनवेल एस टी स्टँडमध्ये तसेच वडखळसाठी रात्री ८ ते ८.३० वाजेपर्यंतच शेवटची एसटी बस सुटते, अशी प्रवाशांमध्ये जोरदार चर्चा आहे. यामुळे मुंबईतून रोजगारासाठी येणारे चाकरमानी रात्री लॉज शोधत राहतात किंवा सकाळपर्यंत स्टँडवर ताटकळत राहतात. सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले, "रायगड जिल्हा परिषद सदस्य व आमदार एसटीतून प्रवास करत नसल्याने जनतेच्या समस्या त्यांना कळतच नाहीत."



"वडखळ प्रवाशांची दयनीय अवस्था"

वडखळ हे रायगडचे मध्यवर्ती गाव असले तरी एसटीने येथील प्रवाशांची पूर्ण उपेक्षा केली आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळला येण्यासाठी अलिबाग बस वगळता इतर कोकणमार्गी गाड्या प्रवाशांना घेत नाहीत, असा तक्रार राजेश म्हात्रे (वडखळ प्रवासी) यांचा आहे. कंडक्टर हात जोडून सांगितल्यावरही नकार देतात आणि काही गाड्या स्टँडला येतच नाहीत.

"निवडून दिलेल्या नेत्यांची उदासीनता"

खासदार, आमदार व जिल्हापरिषद सदस्य एकाही शब्द किंवा कारवाई करत नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे. जनतेमध्ये 'निवडून दिलेल्यांना घेराव घालावा' असा सूर उमटला आहे. देवव्रत विष्णू पाटील यांनी वडखळ, अलिबाग, रेवदंडा, मुरुड प्रवाशांसाठी मार्ग काढण्याची मागणी केली असून, पुढाऱ्यांना फरक पडत नाही.

"डेपोतील भ्रष्टाचाराच्या चर्चा"

पनवेल व अलिबाग बस डेपोचा लेखा जोखा तपासला तर भ्रष्टाचार भरभरून निघेल, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. प्रायव्हेट गाड्यावाले रांगेत उभ्या प्रवाशांना '३०० रुपये द्या, सोडतो' म्हणून लुटतात; एसटी अधिकाऱ्यांसोबत गुप्त समझोता असल्याचे सांगितले जाते. डेपोतील टेलिफोन नेहमी बिझी किंवा बंद असतात, अधिकाऱ्यांची भाषा अरेरावी.

"शासनाकडून अपेक्षा कोलमडल्या"

मोदी सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'सर्व समस्या सुटतील' म्हटले तरी एसटी सेवेचे हाल वाढले आहेत. चालक-कंडक्टर कमतरता, जुन्या बस वेळापत्रक कोलमडलेले असल्याने प्रवासी त्रास सहन करत आहेत. तातडीने रात्रीच्या अतिरिक्त फेर्या, वडखळ थांबे व भ्रष्टाचार तपासाची मागणी जोर धरली आहे.

# कळंबोलीतून ६१ वर्षीय महिला बेपत्ता; शोध घेण्याचे पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**कळंबोली (प्रतिनिधी):** कळंबोली गाव परिसरातील रहिवासी असलेली एक ६१ वर्षीय महिला घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेल्याची घटना घडली आहे . याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात बेपत्ता बेबी केशव परसे (वय ६१ वर्षे) या शुक्रवारी, २७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेल्या आहेत. त्यांचे नातेवाईक किरण केशव परसे यांनी यासंदर्भात कळंबोली पोलीस ठाण्यात माहिती दिली आहे.



बेपत्ता महिला मनोरुग्ण असून त्या मराठी भाषेत बोलतात.

बेपत्ता महिलेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:

नाव: बेबी केशव परसे
वय: ६१ वर्षे
उंची: ५ फूट
रंग: गोरा
बांधा: मध्यम, चेहरा गोल
केस: छोटे
अंगातील कपडे: पिवळ्या रंगाची साडी आणि लाल रंगाचा ब्लाउज.
ओळख : गळयात सफेद मण्यांची माळ असून पायात चप्पल आहे.

संबंधित वर्णनाची महिला कोणाला आढळल्यास किंवा त्याबाबत काही माहिती मिळाल्यास तातडीने कळंबोली पोलीस ठाणे संपर्क क्र 8655354115 , 959 4832244 किंवा जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# जुळल्या सगळ्या त्या आठवणी; ग्राहक संरक्षण कायद्यातील "ती" पहिली दुरुस्ती

१९८६ च्या ग्राहक संरक्षण कायद्यामधे वटहुकुमाद्वारे आणि पूर्वलक्षी प्रभावाने केलेल्या पहिल्या वहिल्या दुरुस्तीची, फारशी माहित नसलेली ही गोष्ट. ही दुरुस्ती का करावी लागली आणि मुंबई ग्राहक पंचायतीने ती कशी चपळाईने घडवून आणली हे आज मी तुम्हाला सांगणार आहे.

ही घटना आहे १९९१ मधली. ग्राहक संरक्षण कायदा जरी २४ डिसेंबर १९८६ पासून अंमलात आला तरी ग्राहक न्यायालये ( जिल्हा ग्राहक मंच आणि राज्य व राष्ट्रीय ग्राहक आयोग) कार्यान्वित होण्यास आणखी एक, दिड वर्षाचा कालावधी लोटला. त्यानंतर १९८९-९० च्या दरम्यान राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडून ग्राहकांना छान छान दिलासा देणारे, ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करणारे अनेक निर्णय येत होते. १९९० मधे लोहिया मशीन्स लिमिटेड (LML) केस मधे मुंबई ग्राहक पंचायतीने जो ऐतिहासिक विजय मिळवून ४ लाखांहून अधिक ग्राहकांना ४० कोटी रुपये मिळवून दिले त्यामुळे राष्ट्रीय ग्राहक आयोगातील अध्यक्ष आणि सदस्यच नाही तर रजिस्ट्रार आणि त्यांचे सगळे अधिकारीही अवाक झाले होते. या केस मुळे मुंबई ग्राहक पंचायतीबद्दल तिथे एक प्रकारचा आदर निर्माण झाला होता. याचा फायदा असा झाला की तेथील तत्कालीन रजिस्ट्रार यांनी माझी एक विनंती मान्य केली आणि राष्ट्रीय ग्राहक आयोगाची सर्व निकालपत्रे त्यांनी दर पंधरवड्याला आपल्याला पाठवायचे मान्य केले. अशी निकालपत्रे आली की अक्षरश: एका रात्रीत मी ती सर्व वाचून काढायचो आणि मग त्यातल्या ग्राहकांना दिलासा देणाऱ्या चांगल्या निकाल पत्रांच्या आधारे लोकसत्तेतील "ग्राहकांशी हितगुज" मधे किंवा आपल्या "ग्राहक" अंकात आम्ही काही कार्यकर्ते लेख लिहीत असू, जेणे करुन नव्या ग्राहक संरक्षण कायद्याबद्दल मोठ्या प्रमाणावर ग्राहक जागृती होण्यास हातभार लागायचा.

एप्रिल १९९१ मधे अशाच एका संध्याकाळी ग्राहक भवन मधून राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडून आलेल्या जजमेंट्सचा जाडजूड गठ्ठा घेऊन मी अगदी खुशीत घरी आलो. ही जजमेंट्स म्हणजे माझ्यासाठी एक मेजवानीच असायची. रात्री जेवण झाल्यावर निवांतपणे मी ती जजमेंट्स वाचायला घेतली. जी जजमेंट्स प्रसिद्धी योग्य होती ती मी वेगळी करुन ठेवत होतो. आणि अशातच एक जजमेट माझ्या वाचनात आले आणि माझ्या पेंगुळलेल्या डोळ्यातील झोपच उडाली. ग्राहक पंचायतीतील माझे ज्येष्ठ मार्गदर्शक *अशोक रावत* यांना लगेच फोन करावा का असा विचारही मनात आला. घड्याळात पाहिले तर रात्रीचे १२.३० होऊन गेले होते. त्यामुळे त्या बेचैन अवस्थेतच सकाळ होण्याची वाट बघत "करवटे बदलते रहे सारी रात हम".

सकाळ होताच अशोक रावांना राष्ट्रीय आयोगाचा तो धक्कादायक निकाल मी सांगितला. राष्ट्रीय आयोगाने मारुती उद्योग लिमिटेडचा एक रिव्हीजन अर्ज मान्य करत दिलीप गांधी या ग्राहकाच्या बाजूने दिल्लीच्या जिल्हा ग्राहक मंचाने आणि राज्य आयोगाने दिलेला निर्णय रद्दबातल केला होता. जिल्हा मंचाचा मूळ निर्णय केवळ तांत्रिक बाबीवर रद्द करण्यात आला होता हे महत्त्वाचे. काय होती ही तांत्रिक बाब? दिल्ली जिल्हा ग्राहक मंचाने मारुती उद्योगा विरुद्ध दिलेल्या निकालपत्रावर अध्यक्ष आणि फक्त एका सदस्याचीच सही होती. ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम १४ (२) नुसार जिल्हा मंचाच्या निकाल पत्रावर अध्यक्ष आणि दोन्ही सदस्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक होते. आणि त्यामुळे या प्रकरणात प्रत्यक्षात अध्यक्षां व्यतिरिक्त एकाच सदस्याची स्वाक्षरी असल्याने सदर निकाल पत्र अवैध असल्याचा मारुती उद्योग कंपनीचा दावा होता. राज्य आयोगाने अपिलात तो फेटाळून लावला होता. परंतु राष्ट्रीय आयोगाने मात्र हा मुद्दा उचलून धरला आणि दिल्ली जिल्हा मंचाचा ग्राहकाच्या बाजूने दिलेला मूळ निर्णय या तांत्रिक मुद्द्यावर रद्द केला.

त्यावेळी मुंबई जिल्हा ग्राहक मंचात तर अशी परिस्थिती होती की तेथील एक सदस्य नेमणूक झाल्यापासून कामावर रुजूच झाला नव्हता. दुसऱ्या सदस्या होत्या मुंबई ग्राहक पंचायतीच्याच *ललिता कुलकर्णी*. त्या जिल्हा मंचाने तोवर दिलेल्या जवळजवळ ४०० ते ४५० निकाल पत्रांवर अध्यक्ष आणि फक्त एका सदस्याचीच (ललितातांईचीच) स्वाक्षरी होती. हे सर्व निर्णय आता आपोआप रद्द बातल होऊन फार मोठा गोंधळ निर्माण होणार होता.

त्याहूनही गंभीर बाब म्हणजे मुंबई आणि महाराष्ट्रातीलच नाही तर देशभरातील अनेक जिल्हा ग्राहक मंचांनी त्यावेळी दिलेल्या निर्णयांवर अध्यक्ष आणि एकाच सदस्याची स्वाक्षरी असायची. देशातील अनेक जिल्हा ग्राहक मंचांत त्यावेळेला अध्यक्ष आणि एक सदस्य सकाळी सुनावणी घेत असे आणि दुपारच्या सत्रात अध्यक्ष आणि दुसरा सदस्य तक्रारींची सुनावणी घेत असे. कारण अध्यक्षांची नेमणूक पूर्ण वेळ असायची तर सदस्यांची नेमणूक मात्र अर्ध-वेळ असायची. आणि त्यामुळे असे हे सर्व निर्णय राष्ट्रीय आयोगाच्या या निर्णयामुळे चक्क अवैध आणि बेकायदेशीर ठरणार होते. बरं, राष्ट्रीय आयोगाच्या या निर्णयाला पुढे आव्हान देण्यात काही अर्थ नव्हता कारण सदर निर्णय कायदेशीरदृष्ट्या चुकीचा नव्हताच.

अशोक रावतांना सकाळ सकाळीच फोन करुन हे सर्व सांगितले तेंव्हा त्यांनाही माझा मुद्दा पटला. आणि यावर काहीतरी त्वरित पावलं उचलणे आवश्यक आहे यावर आमचं एक मत झालं. त्यानुसार त्या दिवशी दुपारीच मी महाराष्ट्र राज्य आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष माजी न्या. लोणे यांना फोन करून त्यांची भेट मागितली. नेमके त्या दिवशी संध्याकाळी ते नागपूरला निघण्याच्या घाईत होते. परंतु मी त्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देताच त्यांनी मला तातडीने घरी बोलावून घेतले. त्यांना राष्ट्रीय आयोगाच्या निकालाची प्रत दिली आणि होणाऱ्या परिणामांची कल्पनाही दिली. त्यांनी मला ताबडतोब राज्य सरकारच्या ही गोष्ट निदर्शनास आणण्यास सांगितले. राज्य ग्राहक संरक्षण खात्याच्या सचिवांना सुद्धा भेटून आम्ही त्यांच्याही निदर्शनास ही गंभीर बाब आणली.

सुदैवाने तोपर्यंत ही बाब फारशी कोणाला माहित नव्हती. राष्ट्रीय आयोगाचे ते जजमेंट अजून कोणाच्या फारसे हाती लागले नव्हते. एकदा का ही बातमी जगजाहीर झाली असती तर देशातील अक्षरश: हजारो निकालपत्रे या तांत्रिक मुद्यावर रद्द होऊ शकली असती. आणि ते आम्हाला कोणत्याही परिस्थितीत नको होते.

या सर्व प्रश्नावर माझ्या दृष्टिने एकच उपाय होता आणि तो म्हणजे ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १४(२) मध्ये दुरुस्ती करून अध्यक्ष आणि दोन सदस्यांच्या स्वाक्षरीची अट शिथील करुन त्याऐवजी अध्यक्ष आणि एका सदस्याने निकालपत्रावर स्वाक्षरी करण्याची तरतुद करणे आणि ही दुरुस्ती देखील पूर्वलक्षी प्रभावानुसार करायची जेणे करुन देशातील अशी सर्व निकालपत्रे अवैध ठरण्यापासून वाचू शकतील. परंतू हे सर्व केंद्र सरकारच्या अखत्यारीत, कारण हा कायदाच मुळात संसदेने केलेला. तिथपर्यंत पोहोचायचं कसे?

सुदैवाने माझी सह-कार्यकर्ती आणि मुंबई ग्राहक पंचायतची तत्कालीन कार्यवाह *माधुरी लोणकर* माझ्या मदतीला आली. तत्कालीन *ॲडव्होकेट जनरल श्री अरविंद बोबडे* हे तिचे मामा. तिने त्यांची माझी त्वरीत भेट घडवून आणली. त्यांना मी निकालपत्र दाखवून एकूण होणाऱ्या सर्व गंभीर परिणामांची कल्पना दिली. त्यांनाही प्रसंगाचे गांभीर्य कळले. मी त्यांना केंद्रीय ग्राहक मंत्र्यांना याबाबत कलम १४(२) मधे पूर्वलक्षी प्रभावानुसार दुरुस्ती करण्यासाठी त्वरीत वटहुकुम जारी करण्याची शिफारस करणारे पत्र देण्याची विनंती केली. त्यांनी सुद्धा आपली ही मागणी तत्काळ मान्य करुन तिथल्या तिथे ते पत्र तयार करुन त्यांच्याकडून ते त्वरीत दिल्लीला रवाना केले. आपल्या बाजूने आपणही केंद्रीय मंत्र्यांकडे या पत्राचा पाठपुरावा केला आणि अगदी अल्पावधीतच केंद्र सरकारने आपली ही विनंती मान्य करुन १५ जुन १९९१ रोजी ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १४ (२) मध्ये एका खास वटहुकूमाद्वारे पूर्वलक्षी प्रभावानुसार दुरुस्ती करून अध्यक्ष आणि दोन ऐवजी किमान एका सदस्याच्या स्वाक्षरीने निकाल पत्र देता येऊ शकेल अशी तरतूद केली. आणि अखेर अशा प्रकारे कुठेही फारसा गाजावाजा न करता देशातील अनेक ग्राहक जिल्हा मंचांतील हजारो निर्णय केवळ एका तांत्रिक बाबीमुळे रद्द होण्यापासून वाचवण्यात आपण यशस्वी झालो. त्यानंतर या दुरुस्ती वटहुकुमाचे संसदेत रीतसर विधेयक सादर होऊन ही कायम स्वरुपी दुरुस्ती झाली हे सांगणे नलगे.

कायद्यातील दुरुस्त्या या सहसा वटहुकुमाद्वारे करण्यात येत नाही. त्यासाठी रीतसर दुरुस्ती विधेयक संसदेत मांडून त्यावर चर्चा होऊन ते संमत करण्याची सर्वसाधारण प्रथा. तसेच अशा दुरुस्त्या पूर्वलक्षी प्रभावानेही क्वचितच केल्या जातात. पण एकंदरीत हे प्रकरणच असे होते की यात तातडीने आणि पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्ती केली गेली नसती तर असंख्य ग्राहकांचे नाहक नुकसान झाले असते. सुदैवाने केंद्र सरकारने याची वेळीच योग्य ती दखल घेतली आणि पुढचा गंभीर पेचप्रसंग टळला.

सर्वसाधारणपणे एखादा कायदा करण्याची अथवा त्यात दुरुस्ती करण्याची मागणी ग्राहक संस्था करतात तेंव्हा प्रसार माध्यमात त्याला प्रसिद्धी देणे हे आवश्यक असते आणि गरजेचेही असते. सरकारवर आवश्यक तो दबाव आणण्यासाठी त्यावर लेख लिहिणे, सह्यांच्या मोहिमा राबवणे, आंदोलन करणे असे विविध मार्ग अनुसरावे लागतात. पण हे प्रकरणच असे होते की याची कुठेही जाहीर वाच्यता केली असती तर देशातील अशी अध्यक्ष आणि एका सदस्याने स्वाक्षरी केलेली हजारो निकालपत्रे रद्दबातल होऊ शकली असती. त्यामुळे आपण ही मोहीम कुठेही फारसा गाजावाजा न करता फत्ते करुन दाखवली.

ग्राहक संरक्षण कायद्यातील ही पहिलीच दुरुस्ती मुंबई ग्राहक पंचायतीच्या सतर्कतेमुळे आणि ॲडव्होकेट जनरल अरविंद बोबडे यांच्या शिफारस पत्रामुळे होऊ शकली आणि त्यामुळे हजारो ग्राहकांना दिलासा देणारे हे सर्व निवाडे एका तांत्रिक बाबीमुळे रद्दबातल होण्यापासून आपण वाचवू शकलो याचा आनंद हा चिरकाल टिकणारा आहे.

माझ्या या आनंदाला आणखी एक खास राजकीय झालर आहे, ती दाखवण्याचा मोहही आज मला आवरता येत नाही. तो काळ म्हणजे केंद्रातील राजकीय अस्थिरतेचा काळ होता. नोव्हेंबर १९९० पासून देशात पंतप्रधान चंद्रशेखर यांचे अल्पमतातील सरकार काँग्रेसच्या बाहेरून दिलेल्या पाठिंब्यावर काम करत होते. एप्रिल १९९१च्या अखेरीस आपण वरील प्रमाणे ग्राहक संरक्षण कायद्यातील या दुरुस्तीसाठी केलेल्या प्रयत्नांकडे खरं म्हटलं तर राजकीय अस्थीरतेमुळे दुर्लक्षही होऊ शकले असते. परंतु आपले नशीब बलवत्तर म्हणायला हवे. अशा बिकट परिस्थितीतही चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळाने वटहुकूमाद्वारे या दुरुस्तीचा निर्णय घेतला आणि १५ जून १९९१ रोजी हा वटहुकुम राष्ट्पतींच्या द्वारे जारी झाला. आणि त्यानंतर सहा दिवसांनी २१ जुन रोजी काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्यामुळे चंद्रशेखर सरकार गडगडले आणि नरसिंह राव पंतप्रधान झाले! असो, जे सर्व काही झाले ते ग्राहक चळवळीसाठी चांगलेच झाले.

गेल्या रविवारचा माझा "संडे ब्रंच" वाचल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांनी आणि वाचकांनी अशा जुन्या आठवणी आम्हाला वाचायला आवडतील असे सांगितल्याने आज या "जुळल्या सगळ्या त्या आठवणी ..." आपणास सादर केल्या आहेत. आवडल्यास जरुर आपल्या मित्र-मैत्रिणींना, आप्तेष्टांना शेअर करा. धन्यवाद.

**ॲड. शिरीष वा. देशपांडे**
**कार्याध्यक्ष**
**मुंबई ग्राहक पंचायत**

# राज्याच्या प्रशासकीय सुधारणांमध्ये नागपूर महसूल व पोलीस विभागाची दमदार कामगिरी

## १५० दिवस ई-गव्हर्नन्स मोहिमेमध्ये महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषदेला अनुक्रमे प्रथम, द्वितीय पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : लोकाभिमुख व तत्पर पारदर्शक प्रशासनाच प्रत्यय सर्वसामान्यांना यावा, शासकीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीमध्ये बदलत्या तंत्रज्ञानानुरूप कार्यपद्धतीत सुधारणा व्हाव्यात या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स मोहिमेमध्ये महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषद असा तिहेरी सन्मान झाला. राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयांच्या गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाला प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. याचबरोबर विशेष पोलीस महानिरीक्षक (Special IGP) कार्यालय, नागपूर परिक्षेत्र यांना ई-गव्हर्नन्स व वेबसाईट विकास क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल व नागपूर नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाला आपले सरकार प्रणाली, ई ऑफिस, व्हाट्सअप चॅटबॉटसाठी द्वितीय क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित केले. नागपूर जिल्हा परिषदेला प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमतेत वाढ आणि निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी विकसित केलेल्या "झेडपी पॅनोरमा" ZP Panorama या डॅशबोर्डसाठी गौरविण्यात आले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अपूर्व यशाबद्दल पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार व विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्यावतीने अपर आयुक्त राजेश खवले यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित समारंभासाठी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या मोहिमे अंतर्गत कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सऍप चॅटबॉट, ए आय व ब्लॉकचेनचा शासकीय कामकाजात वापर आणि जीआयएस चा कामात वापर अशा एकूण ७ सर्वंकष मुद्यांवर नागपूरने विशेष कामगिरी केली.

नागपूर विभागाने या मोहिमेमध्ये केलेली कामगिरी ही आदर्श- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले कौतुक

नागपूर विभागाच्या या अपूर्व कागिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. "ई-गव्हर्नन्स ही केवळ तांत्रिक संकल्पना नसून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रभावी साधन आहे. सर्वसामान्यांच्या विकासासाठी, त्यांना सुखकर प्रशासनाचा प्रत्यय देण्यासाठी नागपूर विभागाने या मोहिमेमध्ये केलेली कामगिरी ही आदर्श आहे" या शब्दात त्यांनी कौतुक केले.

या मोहिमेतील कार्यपद्धती अधिक सक्षम होत जावी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुसह्य व्हावे यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून सातत्याने आपण विविध अभियान राबवितो. बदलत्या तंत्रज्ञानाचा चपखल वापर जेवढा अधिक होईल त्या प्रमाणात लोकांना उत्तम व पारदर्शी प्रशासनाचा अनुभव मिळेल. यादृष्टीने आपल्या महसूल, पोलीस व जिल्हा परिषदेने साध्य केलेले यश महत्त्वाचे आहे. ही कार्यपद्धती अधिक सक्षम होत जावी व प्रत्येकाला उत्तम प्रशासनाची अनुभूती मिळावी असे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगून संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

*विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे द्योतक*

विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, "हा पुरस्कार संपूर्ण नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे द्योतक आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहील. भविष्यातही अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर दिला जाईल." असे त्यांनी सांगितले.

## विवाहित बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता घराबाहेर पडलेली एक विवाहित अद्याप घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मुस्कान तमजुल शेख (वय-२२ वर्ष) असे या विवाहितेचे नाव असून तिचा रंग-गोरा, उंची अंदाजे ५ फुट, केस काळे लांब, नाक-सरळ, डोळे-काळे, बांधा-सडपातळ, अंगात नेसुस लाल रंगाची कुर्ती व लाल रंगाचा सलवार, भाषा-मराठी,



हिंदी बोलणारी व समजते. या महिलेबाबत कोणाला अधिक महिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा मपोहवा शीतल खुंटे यांच्याशी संपर्क साधावा

## सद्गुरु जोग महाराज गुरुकुल निमगाव( पहेला) येथे आरोग्य निदान, मोफत औषधी वितरण व समुपदेशन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा-तालुक्यातील सद्गुरु जोग महाराज गुरुकुल निमगाव( पहेला)येथे दिनांक 29 मार्च 2026 ला आरोग्य निदान ,मोफत औषधी वितरण व समुपदेशन कार्यक्रम घेण्यात आले. आरोग्य तपासणी करण्यापूर्वी डॉ. संजय मानकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक आरोग्य व सांघिक आरोग्याबद्दल विस्तृत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले .याशिवाय सेवांकुर नागपूर या संस्थेच्या सदस्यांना प्रशिक्षणार्थी डॉ. संजय मानकर यांनी मार्गदर्शन केले. सदर शिबिर ह.भ. प. ओमदेवजी चौधरी महाराज यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आले. औषधी वितरण रविभाऊ, रेवानाथ यांनी केले. रुग्णांची नोंदणी सागर यांनी केली .सेवांकुर संस्थेचे डॉ. मयूर आडे ,डॉ.हटवार व इतर विद्यार्थ्यांनी सहकार्य केले .डॉ.संजय मानकर यांनी विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दैनंदिनी लेखन, पुरेशी 6 ते 7तास झोप, योगासन, ज्ञानसाधना, नियमित व्यायाम ,नियमित अभ्यास ,आहार विहार ,ऋतूनुसार फळे व भाज्या खाणे ,कोमट पाणी पिणे ,इत्यादी बद्दल मार्गदर्शन केले. गुरुकुलातील पोषण आहार तयार करणाऱ्या भगिनी सेवेकरी यांचे सुद्धा आरोग्य परीक्षण करून त्यांना मोफत औषधी वितरण करण्यात आली सर्व रुग्णांना खाऊ वाटप करण्यात आले शेवटी शशिकांत हजारे यांनी सर्वांची आभार मानले संपूर्ण शिबीरांनादायक वातावरणात पार पडले समाज जागृती प्रतिष्ठान व सेवांकुर संस्थेचे हरिभक्त परायण नामदेवजी चौधरी महाराज यांनी आभार मानले उपरोक्त संस्थेने दरवर्षी आरोग्य शिबिर घेण्याचे ठरविणे सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या . सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरता सौ .सीमाताई ओमदेव चौधरी व इतर भगिनींनी फार मोलाचे सहकार्य केले .कार्यक्रमाचे आभार संजय एकापुरे यांनी मानले.



## राज्याच्या परिवहन विभागात समांतर प्रशासन; निवृत्ती नंतरही करोडो रुपयांचे भ्रष्टाचाराचे जाळे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्राच्या परिवहन विभागात एका निवृत्त अधिकाऱ्याने बेकायदेशीर 'समांतर प्रशासन' उभारल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. अधिकाऱ्यांच्या बदल्या, ट्रान्सपोर्टरांकडून वसुली आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना खोट्या ए सी बी सापळ्यांत अडकवण्याचा प्रयत्न अशा प्रकारचे धक्कादायक आरोप विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी पुराव्यांसह पत्रकार परिषदेत केले.

या प्रकरणाचे केंद्रबिंदू ठरलेले बजलंग खलमाटे हे निवृत्त असूनही राज्यातील अधिकाऱ्यांवर प्रभाव ठेवत असल्याचा दावा करण्यात आला आहे. वडेट्टीवार यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्ती निवृत्तीनंतरही अधिकाऱ्यांच्या पोस्टिंग आणि बदल्यांमध्ये हस्तक्षेप करत आहेत. हॉटेलमध्ये गुप्त बैठका घेऊन चेकपोस्टवर नियंत्रण ठेवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच मोटार वाहन निरीक्षकांच्या ड्यूटी रोस्टरवरही दबाव आणला जात असल्याचे सांगण्यात आले.

या नेटवर्कमध्ये आरटीओ रवींन भुयाल (अकोला) हे तीन जिल्ह्यांत वसुली करत आहेत. मोटार वाहन निरीक्षक राजेंद्र नागरे छत्रपती संभाजीनगर विभागीय वसुली समन्वय म्हणून काम पाहतात, निलंबित अधिकारी नागेश खैरनार ड्यूटी रोस्टरवर प्रभाव दाखवत राज्यभर वसुली करत आहेत.

हे जाळे केवळ विदर्भापुरते मर्यादित नसून संपूर्ण राज्यभर पसरले आहे. अहमदनगर, सोलापूर आदी ठिकाणी एजंटमार्फत वसुली होत आहे. मुंबई महानगर प्रदेशातही विस्ताराचा प्रयत्न सुरू असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

वसुलीतून मिळालेला हा करोडो रुपयांचा काळा पैसा पालघर जिल्ह्यातील जमिनीत बेनामी गुंतवला जात असल्याचा आरोपही करण्यात आला. गेल्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणावर व्यवहार झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे वसुलीस नकार देणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांना खोट्या ए सी बी सापळ्यात अडकवण्याची धमकी दिली जाते, असा आरोप आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एका मोटार वाहन निरीक्षकाविरोधातील प्रकरणाचा दाखला देत एफ आय आर मधील विसंगतीही वडेट्टीवार यांनी मांडल्या.

बजलंग खलमाटे यांच्यावर यापूर्वी विविध केंद्रीय आणि राज्य यंत्रणांनी कारवाई केल्याचा दावा करण्यात आला. २०२१ ई डी कडून नागपूर, पुणे, सांगली येथे छापे, २०२२ आयकर विभागाकडून कारवाई, २०२४ ई ओ डब्लू चौकशी आदेशित केले. अनेक वेळा निलंबन आणि ए सी बी कडे तक्रारी

वडेट्टीवार यांनी या प्रकरणी तातडीने उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची, संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची आणि खोटे एफ आय आर रद्द करण्याची मागणी केली आहे."परिवहन विभागातील हे 'समांतर प्रशासन' मोडीत काढले नाही, तर भ्रष्टाचाराचे जाळे आणखी घट्ट होईल," असा इशाराही त्यांनी दिला.

## भरदिवसा शेड फोडून दहा शेळ्यांची चोरी

**शिरूर कासार प्रतिनिधी**

**रामकिसन कातकडे :** शिरूर कासार (युवक आधार प्रतिनिधी) तालुक्यातील हिवरसिंगा येथे भरदिवसा पत्र्याच्या शेडचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १० शेळ्या लंपास केल्याची धक्कादायक घटना गुरुवार (दि.२६) रोजी घडली. या प्रकरणी ५४ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याने शिरूर कासार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिवरसिंगा येथील सचिन सुभाष बडे (वय ३६) यांच्या बीड- शिरूर रोडलगत असलेल्या पत्र्याच्या शेडचा दरवाजा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. शेडमध्ये बांधलेल्या ४ मोठ्या शेळ्या, २ लहान बोकड आणि ४ लहान शेळ्या अशा एकूण १० शेळ्या अज्ञात चोरट्यांनी चारचाकी वाहनातून भरदिवसा लंपास केल्या. या घटनेप्रकरणी शुक्रवार (दि. २७) रोजी शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या चोरीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तालुक्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता व्यक्त होत आहे. पोलिसांचा धाक कमी झाल्याची चर्चा देखील नागरिकांत सुरू आहे. दरम्यान, सदर घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून पुढील तपास पोलीस हवालदार तांदळे हे करत आहेत.

## १५० दिवसांच्या सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ प्रथम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्य शासनाच्या १५० दिवसांचा सेवाकर्मी प्लस कार्यक्रम अंतर्गत विविध शासकीय संस्था, महामंडळे, प्राधिकरणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले. या विशेष मोहिमेत राज्यातील इतर महामंडळांप्रमाणे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळानेही राज्यातील महामंडळांच्या वर्गवारीत प्रथम क्रमांक पटकावला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न झाला.सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व्यवस्थापकीय संचालक विजय मगन देवराज आणि त्यांच्या संपूर्ण चमूचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## शब्द आणि अक्षरांच्या संस्कारांचा 'ज्ञानयज्ञ' संपन्न; व्हि. के. हायस्कूलचे आदर्श शिक्षक सुनील धुमाळ सेवानिवृत्त!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विठोबा खंडाप्पा हायस्कूलमधील ज्येष्ठ शिक्षक, जन्मगाव अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी या खेडेगावातील साहित्यिक आणि नाट्य दिग्दर्शक श्री. सुनील महादेव धुमाळ यांचा सेवानिवृत्ती सोहळा नुकताच अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. १ ऑगस्ट १९९४ पासून सुरू झालेला त्यांचा हा प्रदीर्घ ज्ञानदानाचा प्रवास ३१ मार्च२०२६ रोजी हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळवून यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे.



श्री धुमाळ सर हे केवळ एक उत्तम शिक्षकच नाहीत, तर माणूस म्हणूनही अत्यंत आदर्श व्यक्तिमत्व आहेत. शिक्षकी पेशातील मर्यादित वेतनातही त्यांनी आपल्या प्रामाणिक सेवेचा वसा टाकला नाही. याच काळात त्यांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार केले आणि त्यांना उच्चशिक्षित करून समाजात सन्मानाने उभे केले. "शिक्षण म्हणजे केवळ पदव्या मिळवणे नव्हे, तर संकटातही मूल्यांची जपणूक करून कुटुंबाला आणि समाजाला दिशा देणे," हे त्यांनी आपल्या प्रत्यक्ष जगण्यातून सिद्ध करून दाखवले. त्यांच्या साध्या राहणीतून आणि उच्च विचारांतून त्यांनी सर्वांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे. त्यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात १ ऑगस्ट १९९४ मध्ये के.ई.एस. मुराद हमीद टोल विद्यालय, जसवली येथून केली. त्यानंतर १५ ऑगस्ट २००३ ते २०१३ या काळात मेहेंदळे हायस्कूल, रोहा आणि २०१३ पासून आजवर विठोबा खंडाप्पा हायस्कूल, पनवेल येथे त्यांनी अत्यंत निष्ठावान आणि प्रामाणिक सेवा बजावली. या सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक वृंद विद्यार्थी आणि त्यांचे सर्व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांच्या उपस्थितीत त्यांचा यथोचित गौरव व सन्मान करण्यात आला.

एक हाडाचे लेखक आणि नाट्यदिग्दर्शक म्हणून त्यांनी मायबोली मराठीची मराठीची मोठी सेवा केली विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण करण्यासोबत त्यांच्यावर शब्दांच्या आणि अक्षरांची संस्कार करण्याची कार्य त्यांनी अखंडपणे केले अज्ञानाचा अंदाज काळ दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवणारा एक 'ऋषीतुल्य' शिक्षक म्हणून त्यांचा गौरव यावेळी करण्यात आला. त्यांच्या जीवनात आणि संपुर्ण शिक्षकी सेवेत त्यांना त्यांचे वडील महादेव धुमाळ गुरुजी,आई उज्वला धुमाळ यांनी दिलेले उत्तम संस्कार,पत्नी सुविधा धुमाळ यांची संसार व शिक्षकी सेवेत त्यांच्या खांद्याला खांदा लावून दिलेली साथ,अनुजा, सुतेजा व रुग्वेद या आज्ञाधारक व सुसंस्कृत मुलांचे त्यांच्यावरील असलेले प्रेम अशा साऱ्या गोष्टींमुळे ते आज आपली शिक्षकी पेशातील प्रदिर्घ सेवा यशस्वीपणे पार पाडत आहेत.

यावेळी उपस्थित सर्वांनी त्यांच्या पुढील सुखी ,समाधानी आणि आरोग्यदायी भावी वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.

# अबब!!! केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला ५० कोटींचा मानहानी चा दावा

**दैनिक युवक आधार**

**तालुका कर्जत - वैभव गायकवाड :** गेल्या अनेक दिवसांपासुन राजकारणासंबंधी अचंभीत करणारे नवनवीन खुलासे व बातम्या बाहेर येऊ लागल्या आहेत. अशीच एक घटना महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप निर्माण करू शकते ती म्हणजे, केंद्रीय रस्ते वाहतूक व विकास मंत्री नितीनजी गडकरी यांनी केलेला ५० कोटींच्या मानहानीचा खटाला.

तो नक्की कोणावर केला? व का केला? थोडक्यात जाणून घेऊया.

गेल्या आठवड्यात "THE CARA-VAN" या मासिकाने एक बातमी छापली, ती बातमी होती, "एका ट्रक मधून गोमांस ट्रान्सपोर्ट केले जात आहे अशी माहिती पुणे पोलिसांना मिळाली, या माहितीच्या आधारे पुणे पोलिसांनी सापळा लावून NL 01 AB 5853 हा ट्रक पकडला व माहिती मिळाल्याप्रमाणे त्या ट्रक मध्ये मांस मिळाले. पोलिसांनी ताबडतोब कारवाई करत चालक अशरफी पासवान आणि क्लीनर शुभम शर्मा यांना अटक केली. ही कारवाई पुणे ग्रामीण पोलिसाच्या हद्दीद झाल्याने वडगाव मावळ कोर्टात केस दाखल झाली. ज्या कंपनी द्वारे हे मांस मुंबईला पाठवले जात होते ती कंपनी आहे रेंबल ॲग्रो अँड फूड्स प्रा. ली. ह्या कंपनीमध्ये नितीन कडकरी यांचे चिरंजीव हे संचालक पदावर आहेत. तसेच सी आय ए एन ॲग्रोटेक प्रा. ली.(सदर कंपनी गडकरी कुटुंबाशी निगडित आहे) ह्या कंपनी सोबत संलग्न अशी ह्या कंपनीद्वारे २८ टन मांस ज्याची किंमत तब्बल ६० लाख रुपये इतकी आहे, मुंबई विमानतळावरून UAE, ओमान व व्हिएतनाम यासारख्या देशांमध्ये पाठवले जाणार होते.

ही घटना कोर्टासमोर आल्यानंतर कंपनीतर्फे असे सांगण्यात आले की हे गोमांस नसून म्हशीचे मांस आहे, परंतु कोर्टास संशय आल्याने त्यासंबंधी कागदपत्रे पडताळणीसाठी मागितली असता असे समजले की कंपनी हैदराबादहुन मुंबईला मांसाची वाहतूक करत होता, परंतु त्याच्याकडे हैदराबादच्या पशुसंवर्धन विभागाची परवानगी नव्हती. त्याऐवजी आरोग्य प्रमाणपत्र अलीगडमधील एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केले होते, शिवाय, मोठ्या प्रमाणात मालाच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेला एक इलेक्ट्रॉनिक दस्तऐवज (ई वे बिल) रेहान नावाच्या एका व्यक्तीच्या, चौधरी एंटरप्राइजेस या कंपनीने तयार केले होते. हा रेहान व्यक्ती स्वतः नागपूर मध्ये राहत होता, ज्यामुळे या संपूर्ण व्यवहाराच्या भौगोलिक व्याप्ती मध्ये गोंधळ निर्माण झाला. त्यामुळे न्यायाधीशांनी असे निरीक्षण दर्शवली की हे मांस गाईचे नसून म्हशीचे आहे हे दर्शवणारे कोणतेही कागदपत्र दाखल केले गेले नाही."

ही संपूर्ण घटना कोणत्याही वृत्तपत्रात किंवा कोणत्याही वाहिनीवर प्रसिद्ध झाली नाही, परंतु एक सोशल मीडिया इन्फ्लुएंजर मुकेश मोहन ने त्याच्या सोशल मीडिया अकाउंट वरून प्रसिद्ध केली. सबब, काही दिवसांमध्येच मुकेश मोहन याला कायदेशीर कारवाई चे तसेच ५० कोटींचे मनहानीचे पत्रक मिळाले. पोलिसांद्वारे मुकेश मोहन याचा मोबाईल व इतर इलेक्ट्रिक साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सोशल मीडिया वर या कारवाई मुळे खूप मोठा असंतोष पाहवयास मिळाला. अनेक जण मुकेश मोहन याच्या बाजूने उभे राहिलेले दिसले. एखादी सत्य घटना जगासमोर मांडण्याची असली कसली शिक्षा? हा प्रश्न सर्वत्र विचारला जात आहे. सत्ताधारी तेसुद्धा बड्या नेत्याशी संबंधित काही घटना समोर आणणाऱ्यास कशाप्रकारे कायद्याचा मार बसतो आणि आरोपी कशा प्रकारे कायद्यातून पळवाट काढून निसटून जातो हे आपण उघड्या डोळ्याने फक्त बघत राहतो.

## अमृत नगर येथील वारंवार वाहणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या घाणीच्या पाण्यामुळे नागरिक त्रस्त ; रोगराई पसरण्याचा धोका

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** ;अमृत नगर येथील सीबा सोसायटी समोरील सार्वजनिक शौचालयाच्या ड्रेनेज मधील सर्व घाणीचे पाणी अमृत नगर येथील मुख्य रस्त्यावर वारंवार वाहत येत असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरली आहे.यामुळे शेकडो नागरिकांचे येथून येजा करणे कठीण झाले आहे.एवढेच नाही तर हे शौचालयाचे घाण पाणी अमृत नगर रस्त्याच्या खालच्या दिशेने एक किमीपर्यंत वाहत येत आहे. शिवाय हे घाण पाणी रस्त्यावर देखील येत आहे.अमृत नगर हा येथील मुख्य स्टॉप असल्याने या ठिकाणांहून अनेक प्रवासी घाटकोपर स्टेशनकडे जाण्यासाठी येथूनच रिक्षा तसेच बस पकडत असतात. त्यासोबतच याचा त्रास वाहन चालकांना देखील सहन करावा लागत आहे.शिवाय शाळकरी लहान मुलांना देखील येथून प्रवास करत असताना घाणीच्या



पाण्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे नागरिकांना याच घाण पाण्यातून ये-जा करावी लागत आहे.हे दुर्गंधीयुक्त शौचालयाचे घाणीचे पाणी रस्त्यावर सर्वत्र वाहत असल्याने याबाबत स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अमृत नगर येथील परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी या अगोदर देखील प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके यांनी याबाबत वारंवार मनपा एन विभाग प्रशासनाकडे तक्रार करूनही अद्याप ही डोळ्यावर काळी पट्टी बांधून बसलेल्या संबंधित एन विभाग प्रशासनाने यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही.

**वारंवार होणाऱ्या या शौचालयाच्या घाणीच्या पाण्याच्या समस्येबाबत अनेकदा संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाकडे तक्रार केली होती.या समस्येचा विषय १७ मार्च पासून प्रलंबित आहे,यावर मनपा एन विभाग अधिकारी वर्गाचे संपूर्णतः दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे हे अधिकारी हेतूपुरस्सर यामध्ये हलगर्जीपणा करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच या प्रभागाचे जबाबदार स्थानिक नगरसेविका यांचे कार्यालय देखील येथे समोरच असून ते जाणीवपूर्वक या समस्येकडे दुर्लक्ष करत डोळेझाक करताना दिसत आहे.त्यामुळे येथील स्थानिक सर्वसामान्य लोकांच्या समस्यांसाठी कोण वाली आहे की नाही ? हा प्रश्न देखील याठिकाणी उद्भवत आहे.**

**- प्रशांत मुके,प्रहार जनशक्ती पक्ष - घाटकोपर विधानसभा अध्यक्ष**

## रायगड ही शिवरायांची भूमी : डॉ . रागिणी नायक

### कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्ह्याची शान राखली : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "कॉंग्रेस हा जनता जनार्दनाचा पक्ष आहे. सद्यःस्थितीत राहुल गांधी सर्वसामान्य जनतेसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करतायत. प्रियांका गांधी मोदींना जशास तसे उत्तर देत आहेत. मोदीजी फक्त मन की बात करतात, जनतेला मात्र वाऱ्यावर सोडतात. ही आजची सत्य परिस्थिती आहे. महागाई गगनाला भिडली आहे. मात्र मोदी सरकारला त्याचे देणेघेणे नाही. त्यामुळे कॉंग्रेस पक्ष कार्यकर्त्यांच्या संघटनावर आणि जनतेच्या समस्यांवर काम करत आहे. यापुढे जिल्हाध्यक्षांना अधिकाधिक अधिकार असतील. कॉंग्रेसचे पदाधिकारी निवडीचे निर्णय वातानुकूलित दालनात बसून दिल्लीतून होणार नाहीत, तर जनतेशी संवाद साधून जिल्हाध्यक्षांना विश्वासात घेऊन होतील. रायगड ही शिवरायांची भूमी आहे. शिवाजी महाराज यांची



ख्याती जगभर आहे. त्यामुळे रायगडमध्ये कॉंग्रेसचेच वर्चस्व राहील, यासाठी आम्ही काम करून कार्यकर्त्यांना बळ देऊ," असे प्रतिपादन कॉंग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या आणि निरीक्षक डॉ. रागिणी नायक यांनी अलिबाग येथे केले आहे. त्या पुढे म्हणाल्या, "शिवरायांच्या भूमीत आल्याचा मला आनंद आहे. 'सृजन संघटन अभियान' जो देशभर राबविला त्याची वीट मजबूत करण्यासाठी मी आली आहे." असे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाल्या.

यावेळी रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीची आढावा बैठक कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (या. २९) अलिबाग येथील 'कॉंग्रेस भवन' येथे पार पडली. यावेळी कॉंग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या आणि निरीक्षक डॉ. रागिणी नायक, प्रदीप राव, मनोज गणोरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "रायगडमध्ये आमच्या कार्यकर्त्यांनी खूप चांगले काम केले आहे. वर्षानुवर्षे जिल्हा परिषदेत शेकापचे वर्चस्व असायचे, यंदा त्यांना चक्क शून्य जागा मिळाल्या. मात्र कॉंग्रेसने तीन जागा लढवून दोन जिंकल्या. त्यामुळे कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्ह्याची शान राखली, हे मी अभिमानाने सांगू इच्छितो."

यावेळी रायगड जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्य डॉ. मनीष पाटील, अविनाश ठाकूर यांचा रागिणी नायक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. डॉ. रागिणी नायक आणि जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कार्यकर्त्यांच्या पक्षाविषयी भावना ऐकून घेतल्या.

यावेळी कॉंग्रेसचे सरचिटणीस ॲड. श्रद्धा ठाकूर, नाना म्हात्रे, युवा अध्यक्ष निखिल ढवळे, अलिबाग कॉंग्रेसचे राजाभाऊ ठाकूर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच अलिबाग, मुरूड पदाधिकारी उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघाचा 34 वा वर्धापन दिन

ठाणे जिल्हा तसे पाहिले तर दुर्गम भागच होय. पूर्वी १३ तालुके होते. त्यामध्ये दोन तालुक्यांची भर पडल्याने एकूण १५ तालुके उदयास आले. परंतु वाढती लोकसंख्या पहाता. ठाणे जिल्ह्याचे विभाजन 1ऑगष्ट 2014 साली करण्यात आले. आणि ठाणे जिल्ह्याचे दोन जिल्हे झाले एक ठाणे तर दुसरा पालघर जिल्हा झाला. या मध्ये ठाणे जिल्ह्यात सात तालुके आणि पालघर जिल्ह्यात आठ तालुके येतात पूर्वी दोन्ही जिल्हे एकत्र होते या मुळे प्रशासकीय सुविधा आणि लोकसंख्येचा भार कमी व्हावा हाच उद्देश होता.

त्या वेळी दोन्ही जिल्हे एकत्र असल्याने वाडा, जव्हार, मोखाडा, डहाणू इ, ठिकाणी जायचे म्हणजे तारेवरची कसरत होती. शिवाय त्या वेळी पाहीजे अशी वहानाची साधने नव्हती. पत्राद्वारे संपर्क करीत असत. आणि पत्रलेखकांचे पत्ते शोधून त्याला आम्ही सभासद करीत होतो.

परंतु पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिली नाही.ठाणे जिल्हा जरी नांवारुपाला आलेला असला तरी शहरी भाग वगळता आजही ग्रामीण भाग हवा तसा विकसित झालेला नाही. तरीसुध्दा शहरी आणि ग्रामीण भागाचे नाते टिकून आहे. उलट ते दृढ होत चालले आहे. याला कारण म्हणजे आता ठाणे जिल्हा औद्योगिक प्रगत झाला आहे. तसेच संपर्काचे साधन व माध्यम होय.पूर्वीचा ठाणे जिल्हा म्हणजे या जिल्ह्याला साहित्यिक,लेखक,सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक असे चतुरस्त्र महत्त्व लाभलेल्या ठाणे जिल्हयाने गेल्या अनेक वर्षात अप्रतिम प्रगती साधली आहे. जिल्ह्यात हजारो शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात अनेक गुणवंत लाभले असून प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या संघटना आहेत. व त्यांचा नांवलौकिकही आहे. परंतु वर्तमानपत्रातून सातत्याने जागल्याची भूमिका बजावणाऱ्या वृत्तपत्र लेखकांची संघटना नव्हती. मनात विचार आला की, मुंबईसारखी नावजलेली वृत्तपत्र लेखकांची संघटना आहे. मग ठाणे जिल्ह्यात का नसावी? आणि पत्रलेखका साठी स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करावा. असा विचार केला. आणि या हेतूने कल्याणमधील ज्येष्ठ पत्रलेखक (पत्रकार) समाजसेवक श्री. दिवाकर गोळपकर, प्रा. उदय सामंत यांनी यासाठी पुढाकार घेतला. वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या निवासी पत्त्याच्या आधारे जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र लेखकांना आवाहने करून कल्याण येथे एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीस प्रा. उदय सामंत, दिवाकर गोळपकर, जैतू मुठोळकर, गजानन माने, मधुकर मुळूक, सुनील झळके, कै डॉ दिलीप धानके, कै मुरलीधर शिर्के विवेक मालसे,विजय चव्हाण मिलिंद पळसुले इ. उपस्थित होते. अशा अनेक बैठकी झाल्या. उन्हा-पावसाची पर्वा न करता प्रत्येक लेखकांच्या घरी गेलो. त्यामध्ये मुरलीधर शिर्के, शांताराम गामणे, लक्ष्मण घागस, कै अरुणकुमार भगत, अरविंद म्हात्रे, सुरेश केणे, रविंद्र घोडविंदे दिलीप गडकरी आदिंचा सहवास असायचाच.

बैठकीअंती पाठपुरावा घेतल्यानंतर अखेर ३१ मार्च १९९१ रोजी ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाची रितसर स्थापना केली. . कोणत्याही राजकीय पक्षाची बांधिलकी न ठेवता वृत्तपत्र लेखकांच्या सुप्त गुणांना वाव देणे, संघाच्या माध्यमातून सतत विविध उपक्रम, कार्यक्रम राबविणे हे उद्दिष्ट ठरवूनच, संघाची वाटचाल सुरू झाली.

प्रथमत: आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या जीवनचरित्रांवर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन केले, त्यास उत्तम



प्रतिसाद लाभला. तसेच सार्वजनिक उपक्रमातील शासकीय, निमशासकीय संस्थांतील कर्मचाऱ्यांना गतीमान करण्यासाठी, प्रशासनात असणारे दोष-अडचणी - उणीवा दूर करण्यासाठी व तमाम जनतेच्या तक्रारी, समस्या संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, विविध साहित्यिक, पालकमंत्री, जनसंपर्क अधिकारी, लोकप्रतिनिधी आदिंच्या कानी घालण्यासाठी 'वार्तालाप, प्रश्नमंजुषा, शिबीर, क्रीडा,शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील व्याख्याने, हितगुंज इ कार्यक्रम करू लागलो. तसेच पत्रलेखन, काव्यलेखन. निबंध स्पर्धा, गणेशोत्सव स्पर्धा, विद्यार्थ्यांचा सत्कार इ. उपक्रम राबवून वृत्तपत्र लेखकांचा गौरव केला. त्यामुळे शहरी ते ग्रामीण भागांमधून वृत्तपत्र लेखकांच्यापत्रांची गती दिवसें-दिवस वाढतच गेली. तसेच विविध स्पर्धांचा सहभागही वाढला. 'आज ठाणे जिल्ह्यातील बहुतांशी - सर्वच वृत्तपत्र लेखकांना कोणत्या ना कोणत्या रुपाने पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एक प्रकारे ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाची चढती कमान, ज़ोरात वाटचाल करीत होती परंतु हे सर्व वीस वर्षांपूर्वी केले. आता ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघ कार्यरत आहे. परंतु काही पत्रलेखक सेवा निवृत्त झाले. तर काही वयोवृद्ध झाले. लिखान करणे शक्य नाही. तरी काही तळमळ करतात. त्या मध्ये सामाजिक कार्य आणि सभासद कमी झाले. तरी आज संघात एक्टिव / धडपडणारे सभासद आहेत.याचा - आम्हाला अतिशय अभिमान वाटतो.

गेल्या तीस वर्षा पूर्वी संघाने भेदभाव न करता धिटाईने असंख्य कार्यक्रम व उपक्रम राबविले. मग ते राजकीय असो की सामाजिक आम्ही आवर्जून बोलावित, त्यामध्ये साहित्यिक लेखक सुध्दा होते. उदा. सुप्रसिध्द नाटककार कै. विद्याधरजी गोखले, गो. रा. खैरनार, खा. नारायण आठवले, ग्राहक चळवळीचे. मधू मंत्री, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेट पंच पिल्लू रिपोर्टर, चंद्रशेखर वाघ, डॉ. भा. व्यं. गिरधारी, दै. सन्मित्रचे संपादक कै स. पां. जोशी, प्रा. वि. चि. फडके, योगेश त्रिवेदी, सुधीर जोगळेकर, पंढरीनाथ सावंत, कै वि. आ. बुवा, पद्माकर कायदे (मंत्रालय),सोमनाथपाटील, सोनावणे, केशव मेश्राम,आनंदराव सुर्यवंशी, प्रा. कै किशोर शांताबाई काळे, तसेच राजकीय गणेश नाईक, प्रा. कै राम कापसे, माजी कामगार मंत्री कै साबीर शेख, कै अनंत तरे, ठाणे,नवी मुंबई, कल्याणचे महापौर,नगराध्यक्ष आदि अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाचे निमंत्रण स्विकारल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटत असे. . संघाने कार्यक्रमाबरोबर कौटुंबिक, वर्षा सहलीचेही आयोजन केले, आरोग्य शिबीर, श्रमदान शिबीर, भूकंप- पूरग्रस्तांना मदत, कर्णबधीरांना श्रवण यंत्रणे प्रदान केली. दरवर्षी भव्य असा मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित केला जात असे. ठाणे जिल्ह्यातील वृत्तपत्र व्हावा, लेखकांचा परिचय त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून संपादक जेष्ठ पत्रलेखक दिवाकर गोळपकर यांनी समाजमनाचे' प्रतिबिंब हा दिवाळी अंक व पत्रलेखकाचे परिचय अंक काढला. आणि राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा घेऊन विजेत्या स्पर्धकांना समारंभपूर्वक मान्यवरांच्या शिफारसीनुसार बक्षिसे दिली जात होती. तेचं दिवाळी अंक ठाणे, कल्याण, मुंबई, नाशिक कारागृहातही दिले जात.आणि महादेव गोळवसकर यानी राज्य स्तरीय पत्रलेखकाचे अधिवेशन घेण्यासाठी सुचना केली. व मान्य करून तयारीला लागलो. सर्वानी मदत केली. आणि कल्याण मध्ये पत्रलेखकांचे राज्यस्तरीय अधिवेशन ठेवून उत्तम प्रकारे पार पडले. . त्यास प्रतिसाद लाभला

संघाच्या सुरुवातीच्या वाटचालीत प्रा. उदय सामंत, दिवाकर गोळपकर, जैतु मुठोळकर, विजय चव्हाण, कैविजय कळंमकर, महादेव गोळवसकर, बी. एन. वाघ, कै दि. भा. मुंडले, कै मधुसूदन ठोसर, कै मुरलीधर शिर्के, अरविंद, म्हात्रे, रमेश सावंत, नाना म्हात्रे,

कै अरुणकुमार भगत, गुरुनाथ तिरपणकर, अशोक हासे, , सुभाष जैन, परशुराम कोठेकर, उदय वानखेडे, सुनील झळके, केशव पवार, शशिकांत जोशी आदिनी साथ दिली. ती आठवण विसरु शकत नाही. आज या संघात अनेक नवीन सदस्य सामील होत आहेत. संघाची स्थापना झाली तेव्हापासून आम्हाला दैनिक सन्मित्र व दें. जनमत यांनी भरपूर प्रसिध्दी दिली व संघाला प्रसिध्दीच्या झोतात आणले. आमच्या प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून दै. जनमतचे संपादक तुषार राजे व सन्मित्रकार कै स. पां. जोशी काका यांचे मार्गदर्शन लाभल्याने आम्ही त्याबद्दल त्यांचे ऋणी आहोत.अशी झाली संघाची भरभराट.

सध्या संघ कार्यरत असून संघाचे अध्यक्ष अरविंद म्हात्रे यांनी कौटुंबिक कारणास्तव राजीनामा दिल्याने अजून अध्यक्ष निवड झाली नाही. ती लवकरात लवकर करावी अशी सभासदांचे म्हणने आहे. संघाची मिटिंग गुरुनाथ तिरपणकर तीन वेळा लावल्याने संघात उत्सुकता निर्माण झाली आहे. आज संघात जेष्ठ पत्रलेखक अनंत बोरसे, महादेव गोळवसकर, सुधीर कनगुटकर, सुनील इंगले, गुरुनाथ तिरपणकर, सुभाष जैन इ पत्रलेखन चालू असून संघ सुरू ठेवला आहे याचा सार्थ अभिमान वाटतो. जेष्ठ साहित्यिक व पत्रलेखक आर, एन पिंजारी,सुर्यकांत भंडागे, प्रदीप जोशी, श्री राम मोरे, नाना म्हात्रे, लक्ष्मण सुरोशी, मनोहर गायकवाड, बी डी गायकवाड, सुभाष जैन अशोक हासे, सुधाकर कांबळी, कन्हैया नालगौड, रमेश घरत इ सभासद कार्यरत असून पूर्वी प्रमाणे संघ पुन्हा जोमाने कामाला लागेल.असे मत सभासदांनी या वर्धापन दिनी व्यक्त केले.

विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यात एकमेव वृत पत्र लेखक संघ आहे, पस्तीव्या वर्षात संघ वाटचाल करीत असून, या वर्धापन दिनानिमित्त आशा बाळगतो की, संघ पुन्हा पूर्वी सारखा भरभराटीस येऊन अधिक सामाजिक उपक्रम राबविण्यास यश येवो, हीच अपेक्षा व हार्दिक शुभेच्छा धन्यवाद

**जैतू मुठोळकर (पत्रलेखक/ पत्रकार) माजी सरचिटणीस ठाणे जिल्हा वृत पत्र लेखक संघ (रजि.)**